# संपादकीय

## अलेक्झांड्रिया लायब्ररीचे पुनरुज्जीवन

तुमच्याजवळ संगणक आणि इंटरनेट असेल तर जगातील कुठलेही पुस्तक तुम्हाला घरच्या घरी बघायला मिळू शकेल, असे कोणी म्हटले तर आपल्याला या क्षणी तरी ती एक कल्पनेचीच झेप वाटेल. परंतु अलेक्झांड्रिया लायब्ररीच्या प्रवर्तकांचा (स्कॉलर्स कलेक्टिव्हचा) तसा प्रयत्न चालू आहे. इजिप्त सरकार आणि युनेस्को यांच्या पुढाकाराने आणि आर्थिक मदतीने त्याला चालना मिळाली आहे. आज या अलेक्झांड्रिया ग्रंथालयात अडीच लाख ग्रंथ आहेत. परंतु अमेरिकेतील कलावंत आणि सॉफ्टवेअर इंजिनिअर्स यांच्या सहकार्याने इजिप्तमधील या सर्वात जुन्या ग्रंथालयाने जगभरातील अभ्यासक संशोधक आणि विद्यार्थी यांना इंटरनेटद्वारे एकत्र आणून, परस्पर संवाद साधता यावा अशी महत्त्वाकांक्षा बाळगलेली आहे.

अलेक्झांड्रियाचे हे ग्रंथालय इ. स. पूर्व तीन हजार वर्षांपूर्वी स्थापन झालेले असून जगातले सर्वोत्तम ग्रंथालय गणले जाई. जगातले प्रत्येक पुस्तक आपल्याकडे उपलब्ध हवे अशी त्या ग्रंथालयाच्या प्रवर्तकांची जिद्द होती. त्यामुळे उपलब्ध ग्रंथांच्या हस्तलिखित प्रतींचा संग्रह करण्यासाठी इजिप्तमधील जाणकार अभ्यासक देशोदेशी जात होते. या ग्रंथालयात बसूनच युक्लिड आणि आर्किमिडीज यांनी आपले संशोधन - ग्रंथलेखन केले. परंतु हजार वर्षांपूर्वी हे ग्रंथालय प्रचंड आग लागून भस्मसात झाले; आणि तोवरचे जगभरचे सगळे संकलित वाङ्मय नष्ट झाले.

हजार वर्षांपूर्वी आगीत नष्ट झालेल्या या ग्रंथालयाच्या पुनर्स्थापनेचा संकल्प इजिप्त सरकारने आणि देशोदेशीच्या संशोधकांनी सोडला. ऑक्टोबर २००२ मध्ये त्यासाठी मुद्दाम बांधण्यात आलेल्या भव्य वास्तूत नव्याने ग्रंथसंग्रहाला आरंभ झाला. आज अडीच लाखावर ग्रंथ येथे आहेत; परंतु इंटरनेटमुळे संपूर्ण जगभरचा कुठलाही ग्रंथ उपलब्ध करून देण्याची या ग्रंथालयाची प्रतिज्ञा आहे. जगातील प्रत्येक ग्रंथ आपल्याकडे हवा ही दोन हजार वर्षांपूर्वीची आकांक्षा - आजच्या जमान्यात वर्ल्ड वाइड वेबमुळे अशक्य कोटीतली उरलेली नाही. आज अनेक ग्रंथालयांद्वारे हजारो ग्रंथ इंटरनेटवर उपलब्ध झालेले आहेत. परंतु त्या सर्वांपेक्षा अलेक्झांड्रिया लायब्ररीचा प्रयत्न अधिक व्यापक व सर्वस्पर्शी असणार आहे.

या लायब्ररीच्या द्वारे अविकसित आशिया-आफ्रिकन देशांमधील शिक्षणव्यवस्थेचा कायापालट घडवून आणण्याचाही उद्देश समोर ठेवण्यात आलेला आहे.

या मार्गात येणाऱ्या अडचणींचा निरास करण्याचाही प्रयत्न चालू आहे. कायदेशीर अडचणी, स्वामीत्व हक्काचे संरक्षण, तांत्रिक अडचणी, भाषांचे वैविध्य, अफाट गुंतवणूक -



या सर्वांना तोंड देऊन मार्ग काढण्यासाठी मोठी रक़्कम उभी करावी लागेल. देशोदेशींच्या शासनाप्रमाणेच तेथील विद्यापीठे आणि विश्वस्त संस्था यांचे सहकार्य त्यासाठी अपेक्षित आहे.

अलेक्झांड्रिया लायब्ररी स्कॉलर्स कलेक्टिव्हची संस्थापक ऱ्होन्डा रोलँड शिअरर ही अमेरिकन सॉफ्टवेअर तज्ज्ञ असून तिने आतापर्यंत आठ लाख डॉलर्स उभे केले आहेत. आणि त्यात भर घालण्यासाठी विविध प्रतिष्ठानांशी ती संपर्क साधत आहे.

कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या विद्यमाने फॅदोन ही ऑनलाईन शिक्षण संस्था चालवण्यात येते. तिचा उपाध्यक्ष डेव्हिड वूल्फ हा असून दि डिजिटल लायब्ररी फेडरेशनचे डायरेक्टर डेव्हिड सीमन यांनीही या लायब्ररीच्या संगणकीय सॉफ्टवेअर विकासात लक्ष घातलेले आहे.

जागतिक पातळीवरच्या ग्राहक-अभ्यासकांसाठी वेबसर्व्हिस सुरू करण्याचा हा प्रकल्प अलेक्झांड्रिया मध्ये असल्याने इस्लामी राष्ट्रांकडूनही त्याला मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य मिळेल असा अंदाज आहे. जगात  युद्धाचे, दहशतवादाचे वातावरण असताना, हिंसा आणि मूलतत्त्ववाद यांनी थैमान घातले असताना, अलेक्झांड्रियाची ही लायब्ररी म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद, सहिष्णुता आणि परस्पर सहकार्य संवाद यांचे ऐतिहासिक प्रतीक ठरणार आहे. इराकच्या सद्दाम हुसेननेही या लायब्ररीसाठी मोठी रक्कम दिलेली आहे; त्यामुळेही काही लोक अस्वस्थ असून सेन्सॉरशिप लादणाऱ्या इस्लामी देशांमध्ये ज्ञानाचा विशुद्ध प्रवाह खेळणार तरी कसा - याबद्दल ते साशंक आहेत.

इजिप्त सरकारने गतवर्षी एक खास कायदा मंजूर करून या लायब्ररीला पूर्ण स्वायत्तता दिलेली आहे. या लायब्ररीचा वापर करणाऱ्यांसाठी अलेक्झांड्रिया सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात आली आहे. याचा वापर करून वेबसाईटला भेट देऊन या लायब्ररीतील ग्रंथ कोणालाही बघता येतील. त्यापैकी हवे असणारे ग्रंथ निवडून आपल्या ऑन स्क्रीन वैयक्तिक लॉकरमध्ये घेता येतील; आणि इजिप्तमधील लायब्ररीच्या सर्व्हरद्वारे या लॉकरचा वापर करता येईल.

या सॉफ्टवेअरमध्ये व्हर्च्युअल सभागृह, क्लासरूम्स आणि कार्यालये यांचीही व्यवस्था आहे. लायब्ररीतील क्लासरूम्सचा वापर निरनिराळ्या विद्यापीठांनाही करता येईल. दूर अंतरावरून शिक्षण ही कल्पना त्यामुळे प्रत्यक्षात उतरवणे सोपे जाईल. न्यू यॉर्क सिटी युनिव्हर्सिटीचे डीन रिचर्ड फॉली यांनी या  अत्यंत प्रगत सॉफ्टवेअरचा वापर करणे फारच सोपे आहे. याबद्दल आपली खात्री पटल्याचे नमूद केले आहे ''केवळ खूप तपशील भरणे हे महत्त्वाचे नाही. त्या माहितीचा वापर करता येईल अशा प्रकारे ती उपलब्ध होणे आवश्यक असते. माहितीचे संकलन, साठवणूक, वापर आणि संक्रमण याकडे हे सॉफ्टवेअर तिऱ्हाइताप्रमाणे पाहत नाही; तर त्या माहितीचा वापर करण्यासाठी ते वेगवेगळ्या प्रकारे आपल्याला उद्युक्त करीत राहते.'' असा अनुभव त्यांनी दिला आहे. लायब्ररीचा वापर वाढत जाईल तसतसे तिचे उत्पन्नही वाढत जाईल.

परंतु अशा प्रकारच्या डिजिटल ग्रंथालयाद्वारे आपले सर्व ग्रंथ जगभरच्या वाचकांना वेबसाईटवर सहजी व मोफत उपलब्ध झाले तर आपल्या प्रकाशनसंस्थांचा व्यवहार कसा चालणार असा प्रश्नही चर्चेत येत आहे. काही लेखकही याबद्दल चिंता करीत आहेत. आपला स्वामीत्त्व हक्क असलेली पुस्तके या ग्रंथालयाला मिळू नयेत अशी व्यवस्था काही प्रकाशक


करीत आहेत. तर स्वामीत्व हक्कातून मुक्त झालेल्या पुस्तकांचाच या ग्रंथालयाने अंतर्भात करावा असे काही कायदपंडित सांगत आहेत.

'इलेक्ट्रॉनिक बुक्स'चे युग एक दिवस अवतरणे अपरिहार्य आहे. वेबचा वापर सुलभ व स्वस्त होणे हे त्यासाठी गरजेचे आहे. ऱ्होडा रोलँड शिअरर हिने सायबर बुकप्लस हे सॉफ्टवेअर तयार करताना, कुठलेही पुस्तक हे वेगवेगळ्या भाषांत व आकारात वाचकाला मिळू शकेल अशी व्यवस्था केलेली आहे. पुस्तकाच्या द्वारे मजकूर वाचण्यावर भर न देता चित्रांवर भर द्यावा असाही तिचा अग्रक्रम आहे.

पुस्तके म्हणजे ज्ञान. आजवर माणसाने जे जे अनुभव घेतले व जीवनव्यवहाराबद्दल ठोकताळे बांधले. त्याचे शब्दरूपातील संकलन. आपल्या अनुभवाचे व ज्ञानाचे संचित. दुसऱ्याशी संवाद साधण्यासाठी विकसित केलेल्या भाषा या माध्यमाचे चिन्हांकित रूपातले आविष्करण.

अलेक्झांड्रिया लायब्ररी इ. स. पूर्व तीन हजार वर्षांपासून इ. स.च्या पहिल्या सहस्त्रकापर्यंत जागतिक ज्ञानाचे केंद्र म्हणून कार्यरत राहिली. आता या नव्या सहस्त्रकात फिनिक्स पक्ष्याप्रमाणे ती पुन्हा कार्यरत होऊन जगभरच्या अभ्यासकांना हवे ते ग्रंथ उपलब्ध करण्यासाठी उद्युक्त झाली आहे. इलेक्ट्रॉनिक, डिजिटल क्षेत्रातील अतर्क्य प्रगतीमुळे जगातल्या कुठल्याही भागातल्या कुणाही अभ्यासकाला इंटरनेटद्वारे या ग्रंथालयाचा घर बसल्या फायदा घेता येईल. पूर्वी कधी काळी असे स्वप्न बघणे हा एक खुळेपणा ठरला असता. आज तो कोणालाही खुळेपणा वाटणार नाही. वाटत नाही. मानवी ज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती यांना भाषा, लिपी, तंत्रज्ञान यातून चालना मिळाली. ग्रंथांद्वारे पिढ्यानुपिढ्या ज्ञानाचे जतन होत राहिले. अखंड प्रवाहीपण कायम राहिले. अलेक्झांड्रिया लायब्ररीचे पुनरुज्जीवन हा प्रकल्प म्हणजे नव्या माहिती तंत्रज्ञानयुगाचे एक वैभवशाली प्रतीक होय.

**-संपादक**




**ग्रामीण बोलीचा शब्दकोश**

**द. ता. भोसले**

**लोकसंस्कृतीतील लोप पावत चाललेल्या अर्थपूर्ण, शब्दांची मनोरंजक माहिती, इतिहास सांगणारा शब्दकोश.**

* हेंगाडा - अडाणी, मूर्ख, चमत्कारिक माणूस
* शेंदाड - कडू काकडीचे पिकलेले गोड फळ
* भगुले - बहुगुणी भांडे

**किंमत : ११०रु. सभासदांना : ८३रु. पोस्टेज : २०रु.**




# साहित्यवार्ता

**'सकाळ' वैदर्भीय आवृत्ती**

''विदर्भातील सर्वसामान्य माणसांच्या आशा-आकांक्षांचे व्यासपीठ म्हणून 'सकाळ'ने काम करावे,'' असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

'सकाळ'च्या विदर्भ आवृत्तीचा प्रारंभ करताना 'सकाळ'च्या 'विदर्भ विकास' विशेषांकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. डॉ. भा. ल. भोळे, डॉ. अभय बंग, प्रा. महेश एलकुंचवार, दत्ता मेघे, महापौर विकास ठाकरे, उत्पादन शुल्कमंत्री अनिल देशमुख, नागपूरचे पालकमंत्री सतीश चतुर्वेदी, ग्रामविकासमंत्री आर. आर. पाटील, खासदार विलास मुत्तेमवार, प्रफुल्ल पटेल, शेतकऱ्यांचे नेते विजय जावंधिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

शरद पवार म्हणाले, ''कुठल्याही राजकीय विचारांशी नाही, तर वाचकांशी बांधिलकी मानणारे हे वृत्तपत्र आहे. त्यामुळे ते सर्वसामान्यांच्या विश्वासाला पात्र ठरलेले आहे. 'सकाळ'ने नेहमी जनसामान्यांबरोबर राहण्याची भूमिका घेतली आहे. जनमानसाचा विचार करणारी ही संस्था आहे. विदर्भाच्या प्रश्नाबाबत गेल्या काही वर्षांत जागृती निर्माण झाली आहे. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी या भागात व्यासपीठाची गरज होती. 'सकाळ'ने ही गरज पूर्ण करावी. कास्तकर, आदिवासी, दलित यांच्या प्रश्नांचे प्रभावी व्यासपीठ व्हावे. असे झाले तर वैदर्भीय वाचकांची जबरदस्त शक्ती 'सकाळ'च्या मागे उभी राहील.''

मूलभूत प्रश्न सोडवणुकीची प्रक्रिया समाजातील मोठ्या वर्गापर्यंत पोचली नाही. प्रगतीच्या फळांचा वाटेकरी हा वर्ग आहे, याची जाणीव करून देणाऱ्या व्यासपीठाची गरज होती. ती 'सकाळ'च्या माध्यमातून पूर्ण व्हावी, सहकार क्षेत्रात आज दुबळा माणूस बाजूला पडून मूठभर लोक बलवान झाले आहेत. यातील दुर्बलांची व्यथा 'सकाळ'च्या माध्यमातून मांडावी. विदर्भातील कारखानदारी अडचणीत आहे. उद्योग, कापड गिरण्या बंद पडल्या आहेत. कामगारांच्या संसाराची होळी होत आहे. कामगार अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेला वाचा फोडतानाच विदर्भाच्या प्रश्नांची 'सकाळ'ने मांडणी करावी,'' अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, ''विविध क्षेत्रांत चांगले काम करणाऱ्या वैदर्भीय सुपुत्रांना व सुकन्यांना सन्मानाचे स्थान द्यावे. नव्या पिढीमध्ये कसदार लेखन पुण्याच्या तुलनेत नागपूर आणि औरंगाबादमध्ये अधिक होताना दिसते आहे. अशा कसदार, दर्जेदार लेखन करणाऱ्यांना संधी मिळावी. वैदर्भीय जनता कशाचाही सहजपणे स्वीकार करीत नाही; पण एखादी गोष्ट पसंत पडली तर त्याची साथही सोडत नाही. हे वैदर्भीयांचे वैशिष्ट्य आहे. परिस्थितीने गरीब असलेली जनताही अंत:करणाने मात्र श्रीमंत आहे.''

'सकाळ'च्या विदर्भ आवृत्तीला शुभेच्छा देताना डॉ. भा. ल. भोळे म्हणाले, ''महाराष्ट्राला

समृद्ध पत्रकारितेचा वारसा लाभलेला आहे. एकीकडे वर्तमानपत्र क्षेत्रातील तंत्रज्ञानात क्रांती होत असताना वर्तमानपत्रांची लोकसंस्कार करण्याची क्षमता क्षीण होत आहे की काय अशी शंका घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.'' पूर्वी वर्तमानपत्र जिज्ञासेने वाचले जायचे. त्यातील शब्दांना विश्वसनीयता होती. आज ती कायम आहे काय, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. 'सकाळ'मुळे पुणे व नागपूरमधील अंतर कमी होण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

डॉ. अभय बंग यांनी आपल्या भाषणात दैनिक 'सकाळ' आणि साप्ताहिक 'सकाळ'मुळे आमच्या कामाला महाराष्ट्रव्यापी चेहरा मिळाला, असे गौरवद्‌गार काढले. 'सकाळ' हे वर्तमानपत्र नाही तर संस्कृती आहे. विदर्भात ही संस्कृती वाढीस लागावी, असे ते म्हणाले. प्रसारमाध्यमे आणि वर्तमानपत्रे सत्यापासून दूर जात असून वाचकांना स्वप्नरंजनात गुंतवत आहेत. ''प्रसारमाध्यमांच्या हाती माहितीची सत्ता आहे. या सत्तेचा वापर सत्तेपासून हजारो किलोमीटर अंतरावर असलेल्या खेड्यातील आदिवासी गोरगरीब, महिला आणि लहान मुलांसाठी व्हावा.''

समाजाच्या सर्व स्तरांत अवमूल्यन झाले आहे. वर्तमानपत्रांचे तसे होऊ नये. त्यांना ध्येयवादी भूमिका घ्यावी लागेल, असे प्रख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांनी सांगितले. 'सकाळ'ने प्रमाण भाषेऐवजी वैदर्भीय भाषेचा वापर करावा. वर्तमानपत्रांनी सामान्य वाचकांबरोबरच बुद्धिवाद्यांच्या बुद्धीला चालना देणारे करणारे लेखन करावे, अशी सूचनाही त्यांनी केली. वर्तमानपत्रांमध्ये फॅशन आणि उच्च श्रीमंतांच्या छंदांना मिळणाऱ्या अवाजवी प्रसिद्धीबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

शेतकरी संघटनेचे नेते विजय जावंधिया यांनी विदर्भाच्या आणि कोरडवाहू शेतकऱ्यांच्या प्रश्नांना 'सकाळ'ने वाचा फोडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्ह्याचे पालकमंत्री सतीश चतुर्वेदी यांचेही शुभेच्छापर भाषण झाले.

### मन म्हणजे मनुष्यत्वाचा सत्त्वांश

'मनुष्य आणि मनाचे राज्य यांचा निकटचा संबंध असून मन म्हणजे मनुष्यत्वाचा सत्त्वांश होय,' असे प्रतिपादन डॉ. शोभा घोलप यांनी राष्ट्रीय मानसशास्त्र परिषदेत 'तत्त्वज्ञान आणि अध्यात्म' या विषयावर बोलताना धुळे येथे केले.

'मन हे मानसशास्त्रातील महत्त्वाचे गृहितक आहे. ते वागणुकीला चालना देऊन तिच्यावर नियंत्रणही ठेवते. त्याला ताब्यात ठेवणे हे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे आहे. सातत्याच्या अभ्यासाने, निग्रहाने, वैराग्याने मन बुद्धीच्या स्वाधीन करता येते,' असे त्यांनी सांगितले.

'चंचल मनावर विजय मिळवण्यासाठी संतांनी भक्ती मार्गाची शिकवण दिलेली आहे. संतांच्या मनोपदेशांचा मेरुमणी म्हणजे समर्थ रामदासकृत मनाचे श्लोक होत. 'प्रभाते मनी राम चिंतित जावा' ही त्यांच्या मनोबोधाची नांदी आहे. संतांचे अभंग नेहमीच मार्गदर्शक ठरतात. मन स्थिर असायला हवे,' असेही त्यांनी पुढे सांगितले.

भारतीय विद्या संशोधन केंद्र, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि धुळे एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजली होती. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी सुनील चिंचोलकर होते.

प्रा. डॉ. समीता टिल्लू यांनी, 'मनाचे श्लोक हे परमार्थाचे मनोविज्ञान सांगतात. त्यांना समर्थांच्या श्लोकांची सनद म्हणता येईल,' असे मत मांडले. भारतीय मानसशास्त्राच्या सखोल



अभ्यासासाठी विद्यापीठ स्तरावर स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत या परिषदेची सांगता झाली.

### 'हायटेक' युद्ध लढणाऱ्या मानवाचा मेंदू मात्र पाषाणयुगीच!

सध्याच्या प्रचंड वेगाने प्रगती करणाऱ्या जगात खेळली जाणारी युद्धे जरी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन खेळली जाणार असली तरी त्या युद्धावर नियंत्रण ठेवणाऱ्या मानवाचा मेंदू मात्र पाषाणयुगातीलच असणार आहे. मानवाने गेल्या कोट्यवधी वर्षांत अनेक विषयांत आश्चर्यकारक प्रगती केली असली तरी मानवाचा मेंदू मात्र विकसित झालेला नाही. असे मत अमेरिकेतील मेन विश्वविद्यालयातील मानववंशशास्त्रज्ञ पॉल रॉस्क यांनी व्यक्त केले आहे .

डेनव्हर येथे भरलेल्या विज्ञान प्रगतीविषयक वार्षिक परिषदेत बोलताना रॉस्क म्हणाले की, मानवाकडे आण्विक तंत्रज्ञानही असले त्याचा वापर करणारा मेंदू मात्र पाषाणयुगीनच आहे. तंत्रज्ञानविषयक विकासाच्या वेगाशी जुळवून घेण्याचा आपल्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेचा वेग फारच कमी आहे. त्यामुळेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने तयार करण्यात आलेली शस्त्रास्त्रे जर अशा मानवी मेंदूकडून प्रत्यक्षात वापरण्यात आली, तर त्याचे परिणाम भयावह होतील, अशी भीतीही रॉस्क यांनी व्यक्त केली.

अमेरिकेने एकीकडे इराकविरुद्ध कोणत्याही क्षणी युद्ध सुरू करण्याची तयारी चालवली असून, दुसरीकडे उत्तर कोरियासह अण्वस्त्रे बाळगण्यावरून तिचे भांडण सुरू आहे. ही परिस्थिती अत्यंत स्फोटक असून सर्व राजकारण्यांनी या सिद्धांताकडे लक्ष देणे अत्यंत निकडीचे आहे, असे मतही रॉस्क यांनी व्यक्त केले.

परिषदेतील शास्त्रज्ञांच्या मते मेंदूच्या वरील पातळ, राखाडी रंगाच्या पापुद्र्यामुळे (सांकेतिक नाव - निओकोर्टेक्स) मानवाला विचार करण्याची अधिकाधिक शक्ती प्राप्त होत असते. युद्ध करणाऱ्या सैनिकांना लढण्याची भावना निर्माण करण्यासही हा मेंदूच जबाबदार असतो. तसेच एखाद्या युद्धात एखाद्या प्रतिस्पर्ध्याकडून मार खाल्ल्यानंतर त्याच्याशी पुन्हा लढताना जी सूडभावना सैनिकांच्या मनात निर्माण होते, त्याचा केंद्रबिंदूही हाच भाग असतो, असे मत या परिषदेत व्यक्त करण्यात आले आहे.

### 'जंगल अनुभवले; आता समुद्रकिनारे न्याहाळायचेत...'

''जंगल खूप अनुभवले, पण समुद्र नीट न्याहाळला नाही. म्हणून समृद्ध पक्षिजीवनाने भरलेल्या समुद्राकाठी वर्षभर मुक्काम ठोकणार आहे,''असे प्रसिद्ध पक्षितज्ज्ञ मारुती चितमपल्ली यांनी पुणे येथे सांगितले.

नऊ मार्चपासून पुढील एक वर्षभर ते कोकणातील हर्णे येथे समुद्रपक्ष्यांवरील संशोधनासाठी राहणार आहेत. यानिमित्त 'युवाशक्ती'चे अध्यक्ष विवेक देशपांडे व डॉ. सतीश पांडे यांनी ही मुलाखत घेतली. वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी अचानक कोकणात जायचा निर्णय कसा घेतलात, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, ''जंगलाचा मी खूप अभ्यास केला, पण समुद्र तेवढा अभ्यासता आला नाही. कोकणात पाच वर्षे राहिलो; पण अजूनही समुद्र अपरिचितच आहे. म्हणून समृद्ध पक्षिजीवन असलेल्या समुद्राकडे वळण्याचे ठरवले आहे.

रानकुत्र्यावरील संशोधनात साथ देणारा तानसू महाजन, झोळंबी या धनगरवाडीत पहाटे तीन वाजता ऐकलेली पक्ष्यांची मैफल, चुटिया हे एका घराचे गाव, घुबडाचा फोटो काढायला

गेल्यावर घुबडाने चिडून उडवलेली हॅट, ती हॅट नदीत पडल्यावर तिच्या मागे नदीत उडी घेणारा कुत्रा व त्याला मगरींनी गिळंकृत करणे, माशांच्या अंडकोषातील खुणांवरून मोसमाची चाहूल घेणारा नवेगाव बांधचा आदिवासी अशा अनेक आठवणींतून त्यांनी डोळ्यांसमोर जंगलच उभे केले. पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली, व्यंकटेश माडगूळकर, नवेगाव बांधचे 'अरण्यपुत्र' माधवराव पाटील, नरहर कुरुंदकर, कोईमतूरचे वनाधिकारी ट्रेसी यांच्या त्यांनी आठवणी सांगितल्या.

पक्षिजीवनाबद्दल बोलताना ते म्हणाले, ''पक्ष्याला स्वत:ची एक खास भाषा असते. धोक्याची सूचना, अन्नाची उपलब्धता अशा अनेक संदेशांसाठी ते तिचा वापर करतात. महाभारतातील कण्वाश्रमात पक्ष्यांची भाषा शिकवली जात असे.'' 'गाथा सप्तशती'तील समृद्ध साहित्याचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. ''कासव झाडावर चढू शकते'' याविषयीचा एक निबंध अनेक पुराव्यांसह नॅचरल सोसायटीकडे पाठवला, परंतु सोसायटीने तो शहानिशा न करताच नाकारला. वन खात्याच्या धोरणामुळे अनेक पक्ष्यांच्या नोंदी सर्वप्रथम घेऊनही त्याचे श्रेय मिळाले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

''सागरी पक्ष्यांवरील या संशोधनाला अर्थसाह्य मिळालेले नाही. त्यासाठी यथाशक्ती मदत करावी,'' असे आवाहन त्यांनी केले. संपर्क - 'युवाशक्ती' (पुणे दूरध्वनी ४४५६६९६ व ४४७६६०१)

### 'वैदिक विश्व'चे संस्थापक योगिराज हरकरे यांचे निधन

आध्यात्मिक क्षेत्रातील योगी पुरुष योगिराज मनोहर हरकरे (वय ९०) यांचे ७ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे व तीन कन्या असा परिवार आहे. आजारी असल्यामुळे हरकरे यांनी काही दिवसांपासून अन्न, पाणी वर्ज्य केले होते. 'वैदिक विश्व' या संस्थेची स्थापना करून भारतात व भारताबाहेर अनेक देशांमध्ये वैदिक विश्वच्या शाखा निर्माण केल्या व मोठा साधक परिवार तयार केला. उच्चशिक्षित व प्रसिद्धी पराङ्मुख असणाऱ्या योगिराजांना विश्व उन्नयन संसद कलकत्ताद्वारे महापुरुष व डॉ. ऑफ सायन्स या उपाध्यांनी गौरविण्यात आले होते.

### रा. ना. दांडेकर स्मृतिप्रीत्यर्थ विशेष कक्ष

प्राच्यविद्या संशोधन संस्थेत ज्येष्ठ प्राच्यविद्यातज्ज्ञ डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या स्मृत्यर्थ विशेष कक्ष १७ मार्चपासून सुरू झाला आहे.

डॉ. दांडेकर यांनी संस्थेसाठी व प्राच्यविद्येसाठी आयुष्य वेचले. त्यांचे स्मारक संस्थेत असावे, या दृष्टीने हा कक्ष उभारण्यात आला त्यांच्या ९५ व्या जन्मदिनी सुरू झालेल्या या कक्षात डॉ. दांडेकर यांची स्वत:ची ग्रंथसंपदा, लेख, त्यांच्या संग्रहातील सुमारे पाच हजार ग्रंथ, त्यांना भेट म्हणून आलेले लेख, नियतकालिके, त्यांचा पत्रव्यवहार ठेवण्यात येईल; तसेच डॉ. दांडेकर यांना मिळालेले पुरस्कार, मानचिन्हेही येथे ठेवण्यात येतील, असे संस्थेच्या कार्यकारी मंडळाने ठरविले आहे.

उत्कर्ष प्रकाशनातर्फे वा. ल. मंजूळ यांनी लिहिलेले 'प्राच्यविद्येचा मानदंड - डॉ. रा. ना. दांडेकर' हे चरित्रही प्रकाशित झाले. श्रीकांत प्रधान यांनी काढलेले त्यांचे तैलचित्र संस्थेला अर्पण करण्यात आले. संस्थेच्या ग्रंथालयाला डॉ. दांडेकर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव आहे.



### चांगल्या विचारांचा 'जागर' करण्याची गरज

''मुलांवर संस्कार करण्याची शक्ती आजचे पालक व शिक्षकांकडे नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी चांगल्या विचारांचा 'जागर'करण्याची गरज आहे,''असे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी सांगितले.

प्राचार्य भोसले यांच्या 'जागर' ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचे प्रकाशन व्यवस्थापनशास्त्रतज्ज्ञ डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांच्या हस्ते झाले आहे. या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आणि 'दीपस्तंभ' ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन 'सकाळ'चे वृत्त संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी केले.

प्राचार्य भोसले म्हणाले, ''जाणकार श्रोता ही फार मोठी शक्ती असते. हल्ली एकमेकांशी बोलणे कमी झाले आहे. बोलताना शब्दापुढे शब्द नव्हे, तर विचारापुढे विचार येणे आवश्यक आहे. आमच्या वेळी प्राध्यापक पूर्ण तयारीनिशी वर्गात शिकवायला येत असत. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे व्याख्यान एक तास ऐकणे म्हणजे जणू जीवन जगण्यासारखे होते. पिढी घडविणारे असे प्राध्यापक आता कमी झाले आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रातून मला स्फूर्ती मिळाली. त्यामुळे त्यांची गौरवगाथा लोकांपर्यंत पोचवण्याचे कार्य करत आहे.''

डॉ. शेजवलकर म्हणाले, ''प्राचार्य भोसले यांचे लेख पुन:पुन्हा वाचण्यासारखे आहेत. त्यांची व्याख्याने लोकांपर्यंत काहीतरी संदेश पोचविणारी व सदसद्विवेक बुद्धी जागृत करणारी असतात''.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''ते माणसातील विवेक जागा करून त्याला सत्प्रवृत्तीच्या मार्गावर नेण्याचे काम सातत्याने करीत असतात.'' प्रकाशन संस्थेच्या रंजना भोसले यांनी स्वागत केले.

### रसिकांचे प्रेम हीच श्रीमंती : पाडगावकर

''रसिकांचे प्रेम हीच आमची श्रीमंती आहे. रसिकांच्या या प्रेमापोटीच मला आजही कविता लिहावीशी वाटते,'' असे कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी सांगताच दीनानाथ नाट्यगृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले.

गेली पाच दशके काव्यातून रसिकांना भरभरून आनंद देणाऱ्या पाडगावकरांना रसिकांनी जेव्हा उभे राहून दाद दिली, तेव्हा त्यांचे आणि रसिकांचे प्रेम किती सेम आहे, याचा प्रत्यय आला.

मंगेश पाडगावकर अमृतमहोत्सवी वर्ष सोहळ्याचे आयोजन पार्ल्याच्या 'हृदयेश आर्ट्स'ने केले होते. मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

''पाडगावकरांच्या कविता अजरामर आहेत. त्यांच्या शब्दातील जादू मराठी माणूस विसरू शकणार नाही. असारस्वताच्या मंदिरातील या पुजाऱ्याला सरस्वतीने सतत शक्ती द्यावी,'' अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आणि त्यांचा 'भोलानाथ' आमच्याही वार्धक्यात पावसाप्रमाणे बरसू दे, अशी भावना व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी शेला, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करताच प्रेक्षकांनी टाळ्यांची बरसात केली. साहित्यिक गंगाधर गाडगीळ, शंकर वैद्य यांनीही पाडगावकरांचे कौतुक केले.

यशवंत देव यांनी स्वरबद्ध केलेल्या पाडगावकरांच्या गाण्यांवरील 'सूर आनंदघन'ही मैफल नंतर सजली. श्रीधर फडके, रवींद्र बिजूर, रंजना जोगळेकर, साधना सरगम, प्रशांत दामले यांनी मैफलीत रंग भरला. 'हृदयेश आर्ट्स'चे अध्यक्ष अविनाश प्रभावळकर यांनी प्रास्ताविक केले. जवाहर बुक डेपोचे दिलीप भोगले यांनी पार्लेकरांतर्फे; तर दीनानाथ नाट्यगृहातील तुकाराम जाधव यांनी शिवमुद्रा देऊन पाडगावकरांचा सत्कार केला. विनायक कुलकर्णी यांनी मनोहारी नेपथ्य केले होते.

मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी या वेळी उत्स्फूर्तपणे -

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,<br>
तुमचं आणि आमचं सेम असतं.<br>
राजकारणात मात्र वेगळं असतं.<br>
निवडून आलं तर...<br>
ते पाच वर्षे पुरतं'

- असे काव्य करताच पाडगावकरांसह सारे सभागृह हास्यस्फोटात सहभागी झाले.

**साहित्य अभिवाचन स्पर्धेला इचलकरंजीमध्ये उत्तम प्रतिसाद**

रंगवर्धन पुणे आणि इचलकरंजीच्या मनोरंजन मंडळाने इचलकरंजीत साहित्य अभिवाचन स्पर्धा आयोजित केली होती.

नाट्य, कविता, कादंबरी असं विविध प्रकारचं साहित्य यानिमित्ताने एकत्र ऐकता आलं. काही दिग्गज लेखकांच्या प्रसिद्ध साहित्यावरील अभिवाचन स्पर्धेत सादर झाले. डॉ. अरुणा ढेरे यांच्या साहित्यावरील 'कृष्णकिनारा' किंवा कवी विंदा करंदीकर यांच्या साहित्यावर डॉ. विद्याधर करंदीकर यांनी लिहिलेला 'स्वच्छंद' हा कार्यक्रम. एकोणीस संघांचा सहभाग होता. 'इंद्रधनू' या स्थानिक संस्थेतर्फे 'भेदिले सूर्यमंडळा' ही रवींद्र भट यांची कादंबरी सौ. चित्कला कुलकर्णी आणि विश्राम कुलकर्णी यांनी सादर केली. गौरी देशपांडे यांच्या 'एकेक पान गळावया'या कादंबरीचे रूपांतर,'घार हिंडते आकाशी'हे नाट्यरूपांतर याचाही उल्लेख करता येईल.

पुण्याच्या यशोगाथा तर्फे परिमला व सुधा म्हात्रे या अंध कलाकारांनीही 'हेलन केलरची यशोगाथा' सादर केली. प्रत्येक अभिवाचनातून आपल्या वाचनाची छाप श्रोत्यांवर पाडण्याचा अधिकाधिक प्रयत्न स्पर्धक करीत होते.

स्पर्धेचे परीक्षक, मुंबईचे परेश मोकाशी यांच्या मते केवळ अस्खलित वाचन, खर्जातील आवाज म्हणजे उत्तम वाचन नव्हे. श्रोत्यांशी सहजतेने संवाद साधणे महत्त्वाचे आहे.

स्पर्धेत सांगलीच्या सप्तक संस्थेने प्रथम क्रमांक मिळविला. 'शब्दांचा पाऊस' हा काव्यवाचन कार्यक्रम सादर केला. तळेगाव दाभाडे येथील कलापिनी संस्थेने प्रभाकर पेंढारकरलिखित 'रारंग ढांग' कादंबरी वाचून दुसरा क्रमांक मिळवला. अनिल बर्वेलिखित 'अकरा कोटी गॅलन पाणी' ही दीर्घकथा सादर करून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे उपनगरीय शाखेने उत्तेजनार्थ पुरस्कार मिळविला. नाटकाशिवाय अन्य कल्पकतापूर्ण सादरीकरणाचा पुरस्कार मुंबईच्या 'अश्वत्थ' संस्थेस मिळाला.

वैयक्तिक पुरस्कार : दिग्दर्शन डॉ. माधव मुतालिक (सप्तक, सांगली), डॉ. अ. शं. परांजपे (कलापिनी), उत्कृष्ट वाचन - वामन पंडित (आचरेकर प्रतिष्ठान, कणकवली), द्वितीय



- सौ. मैत्रेयी मुतालिक (सप्तक), उत्तेजनार्थ - श्रीमती परिमला (यशोगाथा - पुणे), ऋतुजा नलावडे (रिमझिम - सांगली), श्रद्धा कामत (स्मृतिगंध - इचलकरंजी), माधव मुतालिक (सप्तक - सांगली), मयुरेश कोण्णूर (कलापिनी). आकाशवाणीचे निवेदक वामन काळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

**निवडक 'गदिमा'**

अजरामर 'गीतरामायण'चे निर्माते गजानन दिगंबर माडगुळकर म्हणजेच समस्त रसिकांचे 'गदिमा' यांच्या निर्वाणीनंतरच्या पंचविसाव्या वर्षानिमित्त 'गदिमा प्रतिष्ठान'ने नेहरू सेंटर आणि यशवंतराव चव्हाण केंद्र यांच्या सहाय्याने दि. १३ मार्च रोजी 'निवडक गदिमा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. १६५ चित्रपट कथा आणि १६०० गीते लिहिणाऱ्या गदिमांच्या कलाविष्कारातील आत्मवृत्त, नृत्यगीते, कविता चित्रपटातील क्षणचित्रे, मान्यवरांच्या मुलाखती यांचाही समावेश होता. कार्यक्रमाची संकल्पना व लेखन शैला मुकुंद यांचे होते. प्रमोद रानडे, विभावरी आपटे, अनुराधा मराठे, उपेंद्र भट व रवींद्र साठे आदी कलाकारांचा सहभाग होता.

**स्त्रीच्या आत्मविष्काराचे दर्शन घडविणारा महोत्सव**

ओठाआड दबलेले प्रश्न घेऊन जगत आलेली स्त्री हळूहळू बोलू लागली. कधी विठ्ठलाच्या भक्तीसाठी, तर कधी स्त्री-मुक्तीसाठी ती स्वत:च स्वत:ला शोधू लागली. जनाबाई ते गौरी देशपांडे अशा विविध रूपांत ती आसपास दिसू लागली...स्त्रीच्या आत्माविष्काराचेच दर्शन घडवण्यात आणि आशय सांस्कृतिक संस्था व पाथ फाईंडर या पुस्तक विक्री दुकानातर्फे जागतिक महिलादिनानिमित्त 'स्त्री उवाच...'या अभिवाचन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवातील पहिला कार्यक्रम 'ती व्यक्त होते तेव्हा...' 'पाथ फाइंडर'मध्ये झाला. युगानुयुगे लोटली तरी स्त्रीचे केवळ बाह्य रूपच बदलले. आजही आधुनिकतेच्या बुरख्याखाली तिची मूळची प्रतिमा, त्याग, भावना मात्र समजून घेतल्या जात नाहीत. तिला वरकरणी स्वातंत्र्य आहे, असे दिसत असले तरी ती एक 'स्त्री' आहे याची पदोपदी तिला जाणीव करून दिली जाते. याचा प्रत्यय या कार्यक्रमातून आला.

विनीता पिंपळखरे यांनी दिग्दर्शित केलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील स्त्रियांची आत्मकथने काव्य, निबंध यांतून मांडण्यात आली. डॉ. संगीता बर्वे, सुजाता शेणई, सुप्रिया गोडबोले, नालंदा जोगळेकर, सोनाली नांदूरकर व श्रीमती पिंपळखरे यांनी हा कार्यक्रम सादर केला. या निमित्ताने स्त्रीविषयक साहित्याचे प्रदर्शनही मांडण्यात आले. त्यात देश-विदेशातील विविध क्षेत्रातील सुमारे पाचशे पुस्तके मांडण्यात आली.

**अक्षयकुमारच्या हस्ते ई-बुकचे उद्घाटन**

दूरध्वनीची 'डिरेक्टरी', व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पुस्तके, शासकीय कामकाजाचे अहवाल एकाच छोट्या पुस्तकात मावतील, अशी व्यवस्था करणे यापुढे 'ई-बुक' या छोट्या पुस्तकाएवढ्या आकाराच्या उपकरणाद्वारे शक्य होणार आहे.

पुण्यामध्ये 'ई-बुक'च्या वितरण व विक्रीकरिता 'क्रॉसवर्ड'ची निवड करण्यात आली असून, या उपकरणाचा 'ब्रँड अँबेसेडर' म्हणून पुणे ई-बुकचे औपचारिक उद्घाटन अक्षयकुमार

याच्या हस्ते झाले.

लंडनमधील 'ॲशटेल ग्रुप'ची भारतातील उपकंपनी 'ॲशटेल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'ने उपकरण बाजारात आणले आहे. या उपकरणाचे तीन महिन्यांपूर्वी पुण्यात आगमन झाले असून आतापर्यंत यासाठी दहा लाख लोकांनी मागणी नोंदविली आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष ॲश दासवानी यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, ''यापूर्वी हे उपकरण फक्त चीन व इंग्लंडमध्ये उपलब्ध होते. मुख्यत्वे शिक्षण, आरोग्य व संरक्षण क्षेत्रासाठी हे उपकरण बाजारात आणले असले, तरी संदर्भ ग्रंथ, नकाशे इत्यादी माहितीही यात साठवता येऊ शकेल. त्याला साडेसहा इंचांचा पडदा असून बॅटरी कमी प्रमाणात लागत असल्याने जवळपास २४ तासही यावर पाने वाचता येतात. त्याची किंमत सध्या नऊ हजार पाचशे रुपये आहे.''

### कृषी साहित्य संमेलन

राज्याच्या कृषी विभागातर्फे पहिले 'कृषी साहित्य' संमेलन लवकरच भरवले जाण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांतील साहित्यप्रेमी एकत्र येऊन साहित्य संमेलने भरवू लागले आहेत. विदर्भ, मराठवाडा, कोकण, मालवणी अशा प्रादेशिक संमेलनांबरोबरच उपनगरी संमेलनेही होऊ लागली आहेत. कामगार, डॉक्टर, अभियंते, उद्योजक यांची साहित्य संमेलने होत आहेत. ख्रिस्ती, मुस्लिम, दलित, ग्रामीण, गुराखी, आदिवासी यांबरोबरच मराठा, दैवज्ञ सोनार यांचीही साहित्य संमेलने भरवली जात आहेत. या पार्श्वभूमीवर पहिले 'कृषी साहित्य'संमेलन भरवण्यात येणार आहे.

साहित्यप्रेमी कृषिमंत्री गोविंदराव आदिक यांच्या पुढाकाराने हे संमेलन होणार आहे. त्यामुळे ते नगर परिसरात भरवले जाईल. यासंदर्भात श्री. आदिक म्हणाले, ''साहित्य आता शेतकरी निर्माण करू लागला आहे. ना. धों. महानोर यांनी 'रानातल्या कविता'लिहून शेतकऱ्यांना सूर दिला. तो आता आपले अनुभव मांडू लागला आहे. विठ्ठल वाघांसारखा कवी शेतकऱ्याचे दुःख शब्दांत व्यक्त करीत आहे. त्यांच्या आसपास अनेक जण लिहिते झाले आहेत. शेतीविषयी शास्त्रीय माहिती देणारी पुस्तकेही अनेकजण मेहनतीने लिहीत आहेत. या साऱ्यांना एका व्यासपीठावर आणून विचारांची देवाणघेवाण करणारे संमेलन भरवण्यात मला स्वारस्य आहे.''

### 'अलेक्झांड्रिया'ने जमवली शब्दांची रत्ने

सागरकिनारी वसलेल्या इजिप्तमधील अलेक्झांड्रिया शहरातील जगप्रसिद्ध ग्रंथालयामध्ये प्राचीन काहातील मौलिक ग्रंथ आणि दुर्मिळ हस्तलिखिते यांच्या मूळ प्रती जतन केल्या आहेत. सुसंस्कृत जगाचा हा अनमोल वारसा आता इंटरनेटवर (ऑनलाईन) उपलब्ध करण्यात आला असून जिज्ञासूंना क्षणार्धात उपलब्ध होऊ शकेल.

या ग्रंथालयास मागे आग लागून ग्रंथसाठा नष्ट झाला होता, परंतु तेथील ग्रंथप्रेमी सत्ताधाऱ्यांनी अथक प्रयत्न करून विविध देशांतून जुने ग्रंथ मागावून नव्या जोमाने ग्रंथालयाची पूर्ववत उभारणी केली. आजच्या घडीला या ग्रंथालयात एकूण अडीच लाख ग्रंथ असून ते सर्व ग्रंथ इंटरनेटवर केवळ माऊस क्लिक करताच ताबडतोब अभ्यासू वाचकांना उपलब्ध होतील.ग्रंथालयाची इमारत पोलादी कवच आणि काचा वापरून सुरक्षित बनविण्यात आली आहे. अमेरिकन वास्तुशास्त्रज्ञ आणि संगणत तज्ज्ञांनी ग्रंथालयाच्या आधुनिक रचनेत उल्लेखनीय सहभाग घेतला



आहे. आर्किमिडीज आणि युक्लीडसारख्या थोर गणितींनी आणि शास्त्रज्ञांनी पाया घातलेल्या ग्रंथालयाकडे प्राचीन विद्वान संशोधक अभ्यासक सदोदित आकर्षित होत आहेत.

बहुतेक सर्व प्रगत देशांतील ग्रंथालयातील बौद्धिक खजिना इलेक्ट्रॉनिक माध्यमांशी पूर्वीच जोडला गेला आहे. या सर्वांवर मात करण्याचे पाऊल अलेक्झांड्रियातील ग्रंथालयाने उचलले आहे. आफ्रिकेतील १७ देशांमधली ३४ विद्यापीठांची ग्रंथालये अलेक्झांड्रियातील ग्रंथालयाला इंटरनेटद्वारे जोडली गेली आहेत. या ग्रंथालयाच्या बौद्धिक वैभवात भर टाकण्यासाठी तसेच आधुनिक विस्तारासाठी दानशूर व्यक्तींनी वेळोवेळी भरपूर अर्थसाह्य केले आहे. १९९९ मध्ये निधन पावलेले अमेरिकन विचारवंच पॉल मेलॉन यांनी आपल्या मृत्युपत्राद्वारे या ग्रंथालयासाठी ८ लाख डॉलरची रक्कम देणगी म्हणून दिली होती.

जगभर धर्मवेड आणि हिंसाचारामुळे असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे. अशा वेळी सर्वांना सहिष्णुता व नेतिकता आचरणाऱ्यांसाठी अलेक्झांड्रियाच्या ग्रंथालयातील ज्ञानदीप प्रेरणादायी ठरेल, असे ग्रंथालयाचे संचालक ईस्माईल सेरागीलदीन यांनी सांगितले.

### पु. ना. ओकांचा सद्दामला सल्ला !

ताजमहाल नव्हे 'तेजोमहाल'म्हणणारे, भारतीय इतिहासाचे हिंदुत्ववादी दृष्टिकोनाचे अभ्यासक पु. ना. ओक हे वादासाठी प्रसिद्ध! वय झालेय, पण वादाची खुमखुमी कायमच आहे. आता इराक-अमेरिका युद्धाच्या उंबरठ्यावर आहेत. अशा वेळी ओक साहेबांनी आठवण करून दिली आहे ती 'वर्ल्ड वेदिक हेरिटेज'या त्यांच्या मोठ्या ग्रंथाची. त्यात इराकने प्रकाशित केलेल्या एका टपाल तिकिटाचा फोटो देण्यात आला आहे. या तिकिटावर बासरी वाजवणाऱ्या श्रीकृष्णाचे चित्र आहे! इराकी राष्ट्राध्यक्ष सद्दम हुसेनच्या मुलाचे नाव चक्क उदय आहे. पु. ना. ओक यांनी सद्दामला पत्र पाठवून सल्ला दिला आहे की इराकची प्राचीन परंपरा आणि संस्कृती हिंदूच आहे, तिथं वैदिक संस्कृतीची मुळं रुजली आहेत. तिकडे पुन्हा वळा आणि अमेरिकेच्या तापापासून सुटका करून घ्या.

### जीवन सजविणारे साहित्यच खरे संतसाहित्य - किशोरजी व्यास

''सर्व साहित्यामध्ये संतसाहित्य हेच श्रेष्ठ आहे. जे साहित्य जीवन सजविते, ते उत्तम साहित्य आहे. संतांच्या विचारात समताच असते असे नाही, तर ममताही असते. हा समाज माझा आहे असा दृष्टिकोन बाळगावा लागतो,'' असे प्रतिपादन आचार्य किशोर व्यास यांनी औरंगाबाद येथे केले.

संतसाहित्य व शिक्षण संशोधन परिषदेतर्फे आयोजित पहिल्या संतसाहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात आचार्य व्यास बोलत होते. या संमेलनाचे आयोजन ऐतिहासिक मराठवाड्याच्या राजधानीत आणि संतांच्या माहेरात होत आहे, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. नव्या पिढीला या संतसाहित्याची ओळख करून देणे हा या संमेलनाच्या आयोजनाचा एक हेतू आहे, असेही ते म्हणाले.

उत्तम साहित्याचा प्रभाव संपून जात नाही. सात्त्विक आणि भिन्न विचारांच्या साहित्याची निर्मिती होते. संतसाहित्याच्या विचारांचा मागोवा हे या संमेलनाचे उद्दिष्ट आहे. संतांनी दाखविलेली दिशा हीच समाजाची खरी दिशा आहे.''

''बुद्धी आणि तर्क वाढला तर कर्म हीन होते. 'करंटे जाहले सारे जो तो बुद्धी सांगतो'असे

असे समर्थ रामदासांनी सांगितले आहे. माणसांच्या मन-भावनांचा विचार संतसाहित्याने केला आहे. आता बुद्ध्यांकाबरोबर भावनांकही आले आहे. साहित्यात संतसाहित्य हेच श्रेष्ठ आहे. मनाचे संस्कार करणारे साहित्य हे संतांचे आहे. हे साहित्य जीवन सजवते ते उत्तम साहित्य आहे.''

संमेलनाचे स्वागताध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर म्हणाले, ''संतवाङ्मयाने मराठी भाषेला समृद्ध केले आहे. संतसाहित्याच्या सेवकांचे पुण्यस्मरण करण्यासाठी हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संतांची समीक्षा पूर्वग्रहाने केली गेली. संतांनी अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्यासाठीच उपदेश केला. देवाला नवस असे उपाय त्यांनी सुचविले नाहीत. आजच्या काळात संतसाहित्याकडे लोकांचे लक्ष जात आहे ही आनंदाची बाब आहे.''

**ललित साहित्य पुरस्कार नऊ लेखकांना प्रदान**

'ललित रंगभूमी'तर्फे पुणे दूरसंचारचे महाव्यवस्थापक आर. एल. दुबे आणि लेखक सुहास शिरवळकर यांच्या हस्ते नऊ लेखकांना ललित साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले अध्यक्षस्थानी डॉ. विश्वास मेहेंदळे होते. अशोक कोतवाल, बी. गोपनारायण, बबन पोतदार, अर्चना वर्टीकर , रमाकांत लाड, राजलक्ष्मी देशपांडे, शुभांगी नाबर, बाजीराव सोनवणे, बाळासाहेब औटी यांचा पुरस्कार मिळालेल्यांत समावेश आहे.

**ललित-वैचारिक ही विभागणी कृत्रिम**

''लेखनाची ललित व वैचारिक अशी कृत्रिम विभागणी केली जाते. हा लेखनामध्ये उणीव निर्माण करणारा प्रकार आहे,'' असे मत डॉ. सरोजिनी वैद्य यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा 'शरदबाबू लेखिका पुरस्कार' ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते त्यांना देण्यात आला. पाच हजार रुपये व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्योत्स्ना देवधर यांनी हा पुरस्कार पुरस्कृत केला आहे.

डॉ. वैद्य म्हणाल्या,''पूर्वी मराठी साहित्यात वैचारिकतेवर भर दिला जात होता. ललित साहित्यामध्ये भावनात्मकता असते, म्हणून आपण त्यापासून दूर जात होतो. भावनात्मक संवेदनशीलता ही त्यापैकीच आहे, हे लोकांपर्यंत पोचवले पाहिजे. आपल्या पिढीने कर्तव्य निष्ठेने कार्य केले नाही, स्वत:च्या स्वार्थासाठी लेखन केले, असे आरोप पुढील पिढी करेल, अशी सतत भीती वाटत असते.''

प्रा. जाधव म्हणाले, ''वाङ्मयाची व्यापक जाणीव शिक्षकांनी करून दिली. सरोजिनी वैद्य यांनी वाङ्मय जीवनाची समीक्षा आपल्या लेखन प्रवृत्तीशी प्रामाणिक राहून केली आहे. त्यांच्या लेखनामध्ये सतत कुठल्या तरी प्रश्नाचा शोध घेतलेला दिसतो. आत्मसंवाद ही त्यांच्या वाङ्मयाची निर्मितीमागील प्रेरणा आहे. वैचारिक मांडणी करत असताना येणाऱ्या भावनेच्या दडपणाला वाट करून दिली पाहिजे.''

**'जाहिरातींमधून स्त्रीविषयक चुकीच्या संकल्पनांचा प्रसार'**

''स्त्रीच्या निर्णयक्षमतेविषयी व तिच्या अस्तित्वाविषयी जाहिरातींमधून चुकीच्या संकल्पना पसरवल्या जात आहेत,'' असे मत लेखिका मंगला गोडबोले यांनी व्यक्त केले.

भारतीय स्त्री शक्ती जागरण संघटनेने 'जाहिरातीतून पोहोचणारे संदेश' या विषयावर चर्चा आयोजित केली होती.



पत्रकार वर्षा दीक्षित म्हणाल्या, ''जाहिराती तयार करण्यापूर्वी या संस्था सर्व्हे करतात. त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब जाहिरातीतून दिसून येते. अश्लील जाहिरातींच्या विरोधात ग्राहकांची संवेदनशीलता जिवंत राहणे गरजेचे आहे. ॲडव्हर्टायझिंग स्टॅंडर्ड कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेकडे जाहिरातीच्या संदर्भातील तक्रारी नोंदविता येतात.''श्रीमती रजनी दाते म्हणाल्या,''जाहिरातीचा लहान मुलांवर सगळ्यांत जास्त परिणाम होतो. त्यामुळे जाहिरातदारांनी संयमित, करमणूकप्रधान व समाजावर विपरीत परिणाम होणार नाही, अशा जाहिराती प्रसारित कराव्यात.'' सीमा भाकरे म्हणाल्या, ''अश्लील जाहिराती रोखण्यासाठी स्त्रियांनी एकत्र येऊन कायदेशीर मार्गाने लढा द्यायला हवा.'' संघटनेच्या अध्यक्षा मृणालिनी दातार यांनी प्रास्ताविक केले.

**मराठी माध्यमरत्न पुरस्कार**

मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठान व पुणे संस्कृती वैभव प्रतिष्ठान यांच्या वतीने 'मराठी माध्यम रत्न' हे प्रत्येकी पाच हजार रुपयांचे चार पुरस्कार देण्यात येतात.

कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस (२७ फेब्रुवारी) सर्वत्र 'मराठी भाषा दिन'म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त मराठी भाषेच्या संवर्धनार्थ सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर केले जातात. यंदाचे पुरस्कार श्री. प्रल्हाद सावंत, पत्रकार मृणालिनी ढवळे, सतीश कामत, निवेदक सुधीर गाडगीळ व क्रीडासमालोचक बाळ ज. पंडित यांना देण्यात आले.

श्री. प्रल्हाद सावंत यांनी पत्रकार, क्रीडासंघटक, अशा विविध पातळ्यांवर कामगिरी केली आहे. १९८६ पासून आशियाई व ऑलिंपिक क्रीडास्पर्धांचे मराठीमध्ये सातत्याने वृत्तांकन करीत आहेत. 'क्रीडाविश्व'या मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत.

**अक्षरधारा - संगणकावरील अभ्यासक्रम**

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे (टीसीएस) पिंपरी-चिंचवड भागात संगणकाद्वारे प्रौढ साक्षरता उपक्रम राबविला जात आहे. त्यासाठी संस्थेने संगणक दिले आहेत. या वर्गामुळे अनेक निरक्षर महिलांच्या जीवनात आनंद निर्माण झाला आहे. ''दोन उच्च शिक्षित मुलांची आई असूनही मला मात्र लिहिता वाचता येत नव्हते; पण या वर्गात येऊ लागल्यामुळे मला आता बसवरच्या पाट्या वाचता येत आहेत...''ही प्रतिक्रिया आहे आनंदीबाई राऊत या नवसाक्षर महिलेची.

या महिलांना शिक्षण देण्यासाठी 'अक्षरधारा' हा संगणकावरील अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड भागात १८ तर सासवडला १२ केंद्रांमध्ये प्रौढ शिक्षण दिले जात आहे, अश्ता नोकाई या जपानी संस्थेच्या मदतीने आणखी दहा केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. या महिलांना शिकवणाऱ्या प्रेरकांना दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. दिनाज भरुचा यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला जात आहे.

यासंबंधी माहिती देताना संस्थेचे प्रकल्प सल्लागार बी. जी. शिवले म्हणाले, ''आंध्र प्रदेशातील मेडक येथे प्रथम हा प्रकल्प सुरू केला. आतापर्यंत साडेसात हजार महिला शिक्षित झाल्या असून ८००० महिलांचे शिक्षण सुरू आहे.''

प्रतिसाद संस्थेने ग्रामीण भागासाठी तयार केलेल्या 'सुजल' या पाणी शुद्ध करणाऱ्या उपकरणाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. ते पूर्णत: घरगुती पद्धतीचे उपकरण आहे. ते

भाताच्या तुसाची राख, वाळू आदींचा वापर करून तयार केले जाते. त्यासाठी अगदी माफक खर्च येतो. संस्थेतर्फे मावळ तालुक्यातील पुसाणे या गावी हे उपकरण बनविण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे, असेही सांगण्यात आले.

**डॉ. प. वि. वर्तक यांचा गौरव**

प्राच्यविद्या संशोधक डॉ. प. वि. वर्तक यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त अध्यात्म संशोधन मंदिराने गौरव समारंभाचे आयोजन केले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या गावसकर सभागृहात 'महादेव शंकर' या विषयावर डॉ. वर्तकांचे व्याख्यान झाले. एन. सभागृहात विश्वासराव सावरकर यांच्या हस्ते वर्तकांचा सत्कार करण्यात आला. माधव मंत्री, ए. बी. वैद्य, सच्चिदानंद शेवडे, मनोहर लोटलीकर, डॉ. रवींद्र रामदास, डॉ. शरद भुरे, विक्रमराव सावरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**भारतकुमार राऊत यांना डॉ. त्रिपाठी पुरस्कार**

प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राममनोहर त्रिपाठी यांच्या स्मृतीनिमित्त देण्यात येणारा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत यांना ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. त्रिपाठी यांनी विविध धर्म, जाती-जमानी व व्यक्तींना एकमेकांना जोडताना सेतूचे काम केल्याचे गौरवोद्‌गार पुरस्कार स्वीकारताना राऊत यांनी काढले. बातम्यांचे पृथक्करण करण्याची गरज असून दृकश्राव्य माध्यमातील पत्रकारिता आव्हानात्मक बनत चालली आहे, असे प्रमुख पाहुणे गंगाधर गाडगीळ यावेळी म्हणाले.

**अण्णा महाराजांसारख्या संतांची गरज : मुख्यमंत्री**

''मानवतेच्या दृष्टिकोनातून नवीन समाज निर्माण करण्याचे काम अण्णा महाराज करीत आहेत. अशा संतांचीच आज महाराष्ट्राला गरज आहे,'' असे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

सोलापूर येथील श्रीकृष्णाश्रमाचे प्रमुख अण्णा महाराज यांचा अमृतमहोत्सवानिमित्त लोकसभेचे सभापती मनोहर जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी, दुग्धविकासमंत्री आनंदराव देवकाते, महापौर नलिनी चंदेले, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी उज्ज्वला शिंदे उपस्थित होत्या.

**'पायाखाली हिरवळ' काव्यसंग्रहाला पुरस्कार**

''मराठी काव्याची गती मंदावलेली असताना 'पायाखाली हिरवळ' हा काव्यसंग्रह मराठी कवितांना गती देणारा ठरेल. रसिकांना आवाहन करणारा हा काव्यसंग्रह आहे,'' असे मत समीक्षक डॉ. दत्तात्रय दि. पुंडे यांनी व्यक्त केले.

डॉ. श्रीनिवास सिरास यांच्या 'पायाखाली हिरवळ' या काव्यसंग्रंहास यंदाचा 'महाराष्ट्र कवी यशवंत काव्यपुरस्कार' देण्यात आला.

कवी यशवंत यांच्या भगिनी काशीताई पेंढारकर उपस्थित होत्या.

डॉ. पुंडे म्हणाले, ''कवितेचा आस्वाद घेण्यासाठी रसिकांची तयारी लागते. 'पायाखाली हिरवळ' या काव्यसंग्रहातील टिपणे, शीर्षक,स्थळ, तपशील, वातावरण याकडे कवीने



कटाक्षाने लक्ष दिलेले दिसते. त्यांनी कविता बघितल्यासारखी वाटते. अशा काव्यसंग्रहामुळे मराठी काव्यास पुन्हा गती मिळणार आहे.''

श्री. सिरास म्हणाले, ''माझ्या कवितेचे एक विश्व आहे, की जे खासगी वाटावे. त्यामध्ये येणाऱ्या सर्व गोष्टी या पवित्र, गोपनीय व अत्यंत खासगी वाटणाऱ्या आहेत. या कविता माझ्यासाठीच होत्या; पण त्यात सार्वजनिकपणाचे गुण व दु:ख आहेत, अशा साहित्याचा आज सन्मान होत आहे.''

**'साहित्याचा भाग म्हणून चित्रपटाकडे पाहावे'**

''चित्रपटाकडे साहित्याचा भाग म्हणून पाहावे. चित्रपटाच्या संहितेतील वाङमयीन मूल्यांचा अभ्यास व्हायला हवा,'' असे मत दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापिठाच्या मराठी विभागाने प्रवीण जोशी व्याख्यानमालेत आयोजिलेल्या '१० वी फ' या चित्रपटावरील चर्चेच त्या बोलत होत्या. चित्रपटाचे सहदिग्दर्शक सुनील सुकथनकर या वेळी उपस्थित होते. श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना दोघांनी उत्तरे दिली

श्रीमती भावे म्हणाल्या, ''ग्रामीळ भागात शिक्षक व विद्यार्थ्याचे व्यक्तिगत नाते अजूनही टिकून आहे. शहरी भागात हे खूप कमी प्रमाणात घडते; तसेच ही घटना शहरी भागात घडल्यामुळे चित्रपटात शहरी वातावरण येते. हिंसेने प्रश्न न सुटता उलट बिकट हेतो, हा संदेश मला पोचवायचा हाता. लिखाणापेक्षा चित्रपटाच्या माध्यमातून तो प्रभावीपणे पोचेल, अस वाटल्याने हा चित्रपट काढला.''

आर्थिक अडचणीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात विशेषत: खेड्यांतील प्रेक्षकांपर्यंत हा चित्रपट पोचविता येत नाही. प्रायोजक मिळाले तर सर्वापर्यंत तो पोचविता येईल, असेही त्यांनी सांगितले. चित्रपटात मुलींना का घेतले नाही, याबद्दल सांगताना सुकथनकर म्हणाले, ''चित्रपटातील घटना मुलांच्या शाळेत घडली होती; तसेच त्या मुलांनी केलेली मोडतोडीची घटना दाखविताना, त्यांच्या मनात जी पुरुषत्वाची कल्पना होतीव त्या वेळेस असणारी त्यांची मानसिकता त्यांच्याबरोबर मुली असताना दाखविता आली नसती.'' प्रा. मृणालिनी शहा यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मनोहर जाधव यांनी आभार मानले.

**गदिमा स्मारकासाठी ३७ लाख खर्चास मंजुरी**

थोर साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांच्या शेटफळे (ता. आटपाडी) येथील नियोजित स्मारक उभारणीसाठी ३७ लाख २९ हजार १२४ रुपये खर्चाला स्मारक समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मंत्रालयात समाजकल्याणमंत्री व स्मारक समितीचे अध्यक्ष जयवंतराव आवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. आमदार अनिल बाबर, आनंद माडगूळकर, पुण्याच्या उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ कल्पना पाटील आदी उपस्थित होते.

समारक उभारणीसंदर्भात समिती सदस्यांची चौथ्यांदा बैठक झाली. श्रीमती पाटील यांनी स्मारकाचा आराखडा व खर्चाचा तपशील बैठकीत सादर केला. शेटफळे येथील सर्व्हे क्रमांक १९५ मधील ५३८४.११ चौरस मीटर जागा शासनाने ताब्यात घेतली आहे. स्मारकासाठी शासनाने २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. रामदास आठवले यांनी पाच लाख रुपये खासदारनिधीतून मंजूर केले आहेत. हा निधी समितीकडे वर्ग करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरले.

स्मारक आराखड्यामध्ये ३५० चौरस मीटरचे मुख्य सभागृह, वाचनालय, कार्यालय, सार्वजनिक प्रसाधनगृह असे १०६ चौरस मीटर बांधकाम आहे. मंत्री आवळे यांनी कामाच्या निविदा काढण्याची सूचना केली. नियोजित बांधकाम व देखभाल, कर्मचारी वेतन, दिवाबत्तीचा खर्च यांसाठी स्मारकाच्या ठिकाणी व्यापारी गाळे बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

**'कुसुमाग्रजांची कविता घरोघरी पोचवावी'**

'हसत हसत जगावे' हे सहजपणे सांगणारे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज युगप्रवर्तक कवी होते. त्यांची कविता राज्य सरकारने घरोघरी पोचवावी, अशी अपेक्षा लोकसभेचे सभापती मनोहर जोशी यांनी व्यक्त केली.

कुसुमाग्रजावरील विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन केंद्रीय दूरसंचारमंत्री अरुण शौरी यांच्या हस्ते नाशिकला झाले. राज्याचे कृषिमंत्री गोविंदराव आदिक, महापौर दशरथ पाटील, परिवहन राज्यमंत्री प्रशांत हिरे,खासदार उत्तमराव ढिकले, हरिभाऊ महाले, आमदार डॉ. दौलतराव आहेर, आमदार बबनराव घोलप, आदी उपस्थित होते. वसंतविश्व ही संस्था व नाशिक महानगरपालिका यांच्यातर्फे ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर यांच्या तैलचित्राचे अनावरण झाले.

श्री. जोशी म्हणाले, ''कुसुमाग्रजांवरील टपाल तिकीट काढण्यास उशीर झाला, हे खरे आहे. ज्यांच्या घरी हे तिकीट जाईल, ते तिकिट जपून ठेवतीलच; पण कुसुमाग्रजांच्या कवितांतील भावही अंत:करणावर कोरून ठेवतील, अशी खात्री वाटते. ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर प्रथमच कुसुमाग्रजांसाठी सर्व पक्षांचे लोक व्यासपीठावर आज एकत्र आले आहेत.''


श्री. शौरी म्हणाले, ''कुसुमाग्रजांच्या लेखनातून व जीवनातून प्रत्येकाने काही घ्यावे, इतके ते देर्जेदार आहे. कुसुमाग्रजांकडे शब्दवैभव तर होतेच; पण सामान्यांशी असलेले नाते त्यांनी घट्टपणे जपले. कुसुमाग्रजांचे साहित्य मनाला धीर देते; कारण शब्द व जीवनशैली यांच्यात साम्य असणारे ते कवी होते.''

''मुंबईत झालेल्या बॉंबस्फोटामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत. त्यांचा व राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून मी कार्यक्रमास आलो आहे,'' असे सांगून श्री. आदिक म्हणाले, ''मराठी मनात आदराचे स्थान असणाऱ्या कुसुमाग्रजांची स्मृती अखंड तेवत ठेवण्यासाठी ते तिकीट उपयुक्त ठरावे. त्यांचे साहित्य नव्या पिढीलाही प्रेरणादायी ठरणारे आहे.'' कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त हेमंत टकले यांनी सूत्रसंचालन केले.

**१७० एकांकिकांचे प्रकाशन**

आभा प्रकाशन म्हणजेच परेश एजन्सी यांच्या तर्फे एकाच वेळी १७० एकांकिकांचे प्रकाशन करण्याचा विक्रम ''विक्रम गोखले'' यांच्या हस्ते नुकताच नोंदविण्यात आला. नाटककार चं. प्र. देशपांडे प्रमुख पाहुणे होते. नाट्यसमिक्षक सुरेशचंद्र पाध्ये होते. प्रकाशनासाठी या एकांकिका पालखीतून दिंडीने आणण्यात आल्या. श्री. गोखले म्हणाले, ''आज वाचन संस्कृतीकडे लोकांचे दुर्लक्ष होत असताना १७० एकांकिका प्रकाशित करण्याचा विक्रम अभिनंदनीय आहे.'' या घटनेचे आनंद सोहळा या शब्दात पाध्ये यांनी वर्णन केले. प्रकाशक म. ह. भाटे, गो. रा. जोशी यांची भाषणे झाली. माधुरी भाटे यांनी आभार मानले.





# पुरस्कार

**'जोहड'मुळे वाङ्मयाची चौकट विस्तारली**

'कल्पित' हे वाङ्मयातून हद्दपार झाले पाहिजे आणि वास्तवतेला भावनिक ऊब देणारे, वैचारिक लिखाणाला मानवी चेहरा देणारे वाङ्मय निर्माण व्हायला हवे. अशा प्रकारचे लिखाण 'जोहड' या पुस्तकात झाले आहे. त्यामुळे मराठी वाङ्मयाची चौकट विस्तारली,'' असे मत विश्वकोश मंडळाचे मुख्य संपादक रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे 'जोहड' पुस्तकाच्या लेखिका सुरेखा शहा यांना श्री. ना. बनहट्टी पुरस्कार देण्यात आला.

जे साहित्य विचाराला, कार्याला प्रवृत्त करते ते वैचारिक साहित्य होय, असे स्पष्ट करून जाधव म्हणाले, ''जोहड वाचल्याने पाणी वाया घालवताना आपल्यात अपराधीपणाची भावना निर्माण होते. नवीन सामाजिक जबाबदारीचे भान हे पुस्तक देते. माणसांचा संघर्ष, जगणे, गुंतवणूक, भविष्य, सोसणे 'जोहड'मध्ये मांडले आहे.''

श्रीमती शहा म्हणाल्या,''राजेंद्रसिंह पहिल्यांदा गोपालपूरला गेले तेव्हा गावकऱ्यांचे सहकार्य नव्हते. 'जोहड'चे म्हणजे तळ्यांचे काम करायचे म्हटल्यावर बरोबरचे मित्रही निघून गेले. अशा परिस्थितीत एकट्याने सात-आठ महिने राबून एक तळे खणले. त्यानंतर दोन बायका मदतीला पुढे आल्या आणि मग गावेच्या गावे काम पाहण्यास येऊ लागली.'' त्यातून आतापर्यंत दहा हजार तळी बांधली गेली. अरवली नदीसह पाच नद्या वाहत्या झाल्या. या कामातून अनेकांना प्रेरणा मिळत आहे. त्यातूनच सोलापूरमध्ये 'जलबिरादरी' स्थापन होऊन कार्य चालू झाले आहे.''

**डॉ. जयंत नारळीकर यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार**

''सर्वसामान्यच नव्हे; तर समाजधुरीण,ज्येष्ठ नेतेही अंधश्रद्धाळू असतात. अंधश्रद्धा देशाला परवडणारी नाही. आकाशातील ग्रह-ताऱ्यांची दशा पाहून कृती करण्यापेक्षा आपले नशीब आपण ठरवा आणि विधायक कार्य करा,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी केले.

माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांची नव्वदावी जयंती १२ मार्च रोजी साजरी करण्यात आली. या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा 'राष्ट्रीय पुरस्कार' प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला. दोन लाख रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष यशवंतराव चंद्रचूड, प्रतिष्ठानचे

कार्याध्यक्ष मोहन धारिया आदी मान्यवर उपस्थित होते. देशाची, तसेच राज्याचीही कुंडली सध्या मांडली जाते व भविष्य वर्तविले जाते, असे सांगून डॉ. नारळीकर म्हणाले, ''कुंडल्या मांडून विवाह ठरविले जातात. ग्रहदशा पाहून कामे केली जातात; पण आपले भविष्य आपण ठरविले पाहिजे. विज्ञानात प्रगती झालेल्या देशांमध्येही अंधश्रद्धा आहे; पण आपल्याला ती परवडणारी नाही. विज्ञानप्रसारासाठी मी देशात सर्वत्र फिरलो. विज्ञानाविषयी सर्वसामान्यांना आस्था आहे, असे त्या वेळी जाणवले. त्यामुळे त्यांच्यापर्यंत विज्ञान पोचण्यासाठी वाट मोकळी करून द्या. विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर डोळसपणे केला तर देशाच्या सुरक्षिततेही वाढ होईल.''

''राष्ट्रीय एकात्मतेविषयी आपण नेहमी बोलतो; पण इतर कोणत्याही माध्यमापेक्षा विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकांना एकत्र आणता येईल. तंत्रज्ञानाचा उपयोग आपण करतो, पण कोणत्याही तंत्रामागे विज्ञान आहे. विज्ञान आपल्याला कळणार नाही किंवा आपला त्याच्याशी संबंध नाही, असे अनेकांचे म्हणणे असते. पण विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा परिणाम व्यक्तिगत जीवन व देशावर होतो. ग्रह-ताऱ्यांच्या निरीक्षणाचा उपयोग हो का, अशी विचारणा काही जण करतात; पण यातून केपलरचा सिद्धांत, पुढे न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा शोध आणि अंतराळ तंत्रज्ञानापर्यंतची प्रगती साधली गेली आहे,'' असे त्यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार स्वीकारताना अतिशय आनंद झाला, असे सांगून डॉ. नारळीकर म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. ते केवळ राजकारणी नव्हते; तर काव्य, विनोद, साहित्य यांच्यात त्यांना रस होता आणि विज्ञानाविषयी आदर होता. त्यांना माझ्या विषयी आत्मीयताही होती.''

शरद पवार म्हणाले, ''पंडित नेहरू यांचा आदर्श राजकारणात यशवंतरावांनी समोर ठेवला होता. लोकशाही जीवननिष्ठा आणि विज्ञानवादी दृष्टिकोन अशी नेहरूंची शिकवण होती. महात्मा गांधींविषयीही त्यांना आदर होता. एक वेगळी दृष्टी असलेला तो नेता होता.'' समाजधुरीण आणि नेतेमंडळीही अंधश्रद्धाळू असतात. समाज, नवीन पिढी तसेच देशाच्या ते हिताचे नाही, असेही ते म्हणाले.

### अनुराधा पोतदार यांना केशवराव ढेरे पुरस्कार

मराठी साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल यशवंतराव चव्हाण साहित्य सांस्कृतिक मंडळातर्फे देण्यात येणारा केशवराव ढेरे पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री डॉ. अनुराधा पोतदार यांना विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. स. फरांदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विधी व न्याय राज्यमंत्री दिलीप सोपल व समाजकल्याण राज्यमंत्री दिगंबर बागर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाच हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

याच कार्यक्रमात विजय वाघमारे (काव्यसंग्रह - प्रिय पंजाब), प्रा. सुरेश शिंदे (काव्यसंग्रह - काटेवन), प्रकाश घोडके (काव्यसंग्रह - तुझ्या दारातून जाताना), प्रा. राजेंद्र दास (काव्य संग्रह - शब्द भेटण्याच्या वयातच) आणि डॉ. राजेश्री (काव्यसंग्रह - वेळ काळाचा खेळ) विनायक वाघमारे (प्रिय पंजाब) यांनाही पुरस्कार देण्यात आले. प्रसिद्ध वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश ढेरे, विजय मोरे यांनी स्वागत केले.



# फुले आणि काटे

## प्रेरणादायक उपक्रम

## नेहरू सेंटरमधील संवाद

जीवन केवळ जगण्यासाठी नसून ते अनुभवण्यासाठी, काहीतरी वेगळं शोधण्यासाठी आहे. तसंच, ते व्यक्त करण्यासाठीही आहे. रोजच्या जीवनात आपण बऱ्याच गोष्टी बघत असतो. मात्र त्यावर काही विचार करण्याआधीच आपण त्या विसरतो. सध्या धावपळ एवढी वाढली आहे की भविष्यात माणसाला संवेदना म्हणजे काय असते हे देखील सांगता येईल की नाही हे कठीण वाटतंय. जगभरात फिरणं, समाजाची स्पंदनं अनुभवणं हे प्रत्येकालाच जमतं असं नाही. मात्र, साहित्यिक, कवी यांच्या लिखाणातून आपल्याला ते अनुभवता येतं. समाजाकडं पाहण्याचा नवा दृष्टिकोन मिळतो. आपल्या संवेदना अधिक धारदार होतात. मात्र सध्या नेमकं हेच दुर्लभ होत चाललं आहे. वाचनसंस्कृतीवर दाट धुकं पसरलंय. त्यामुळं वाचनापेक्षा चित्रपट, मालिका वा इतर मनोरंजक कार्यक्रम पाहणं याकडंच तरुण मंडळींचा ओढा अधिक दिसतोय. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत 'संवाद'ही संस्था वाचनसंस्कृती टिकवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

'संवाद'चा प्रवास अनोखा असाच आहे. साहित्यिकांवर कार्यक्रम करण्यासाठी १९९५ च्या सुमारास काहीजण एकत्र आले. साहित्यिकांच्या साहित्यावर दीड ते दोन तासांचा कार्यक्रम करताना व्यंकटेश माडगूळकर, बा. भ. बोरकर यांच्या साहित्याचा आढावा घेण्यात येऊ लागला. अशाप्रकारे सुमारे २५ वेगवेगळे कार्यक्रम झाल्यानंतर काही कारणानं एकत्र आलेली मंडळी विखुरली गेली. मधली दोन वर्षे अशीच गेली. मात्र या मंडळींना काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. पुन्हा एकत्र येऊन आपला कार्यक्रम सुरू करावा असं त्यांना वाटत होतं. शेवटी यातील काहीजणांनी नेहरू सेंटरमध्ये संपर्क साधला आणि साहित्यिकांवर कार्यक्रम करण्यास जागेसाठी मागणी केली. तेथील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख लताफत हुसेन यांनी लगेचच त्यांना परवानगी दिली आणि 'संवाद'ची गाडी मार्गाला लागली.

दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजता नेहरू सेंटरमध्ये ऑडिटोरियमच्या मागे काही रसिक माणसे जमू लागली. आदल्या महिन्यात ठरलेल्या साहित्यिकाविषयी प्रत्येकजणच काही ना काही घेऊन आलेला असायचा. वाचलेलं पुस्तक प्रत्येकजण आपल्या आपल्या शैलीत सादर करू लागला. व्यंकटेश माडगूळकर, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष यांचा साहित्यातील प्रवासाचा आढावा घेण्यात येऊ लागला. हळूहळू इथं जमणाऱ्यांची संख्या वाढू लागली. नवखे असणारे सुरुवातीला केवळ श्रोते बनून आस्वाद घेऊ लागले. मात्र, नंतर त्यांनाही, आपण काहीतरी व्यक्त करावं, काहीतरी बोलावं असं वाटू लागलं. पुढच्या वेळेस तेही तयारी करून येऊ लागले. अशा तऱ्हेनं साहित्यावर सर्वांगानं चर्चा होऊ लागली. महिन्यातील तिसरा शुक्रवार कधी येतोय याची ही मंडळी चातकाप्रमाणं वाट पाहू लागली. पाहता-पाहता या कार्यक्रमाचा

पहिला वर्धापनदिन आला.एरवी साहित्यिकाला न बोलावता त्याच्या साहित्याविषयी चचौ करणाऱ्या 'संवाद'नं त्यावेळी सुधीर मोघे यांना बोलावलं. त्यांच्या कविता, समोर ठेवून एक कार्यक्रम करण्यात आला. त्यांची मुलाखतही घेण्यात आली. या कार्यक्रमामुळं 'संवाद'चा अनोखा उपक्रम अनेकांच्या मनात घर करून गेला. अशा या 'संवाद'च्या दुसऱ्या वर्धापनदिनी प्रसिद्ध साहित्यिक शंकर वैद्य यांनी उपस्थिती लावली. यांच्या कविता, समीक्षा, कथा याविषयी कार्यक्रम सादर करण्यात आला. वैद्य देखील भारावून गेले.

सध्या 'संवाद'च्या कार्यक्रमांनी बरीच गती घेतली आहे. दिवाळी अंकावर, बाल साहित्यावर चर्चा घडवून आणणाऱ्या 'संवाद'नं कोषवाङ्मयावरही चर्चा घडवून आणली. मंदार नेरुरकर यांच्या मदतीनं 'आयडियल त्रिवेणी'मध्ये सर्व कोष उपलब्ध करण्यात आले होते. याचा एक वेगळाच अनुभव त्यांना मिळाला. या कार्यक्रमाची माहिती मिळाल्यानंतर रवींद्र पिंगे, प्रभा गणोरकर, नारायण आठवले या मंडळींनी 'संवाद'च्या कार्यक्रमाला भेटी दिल्या. शांता शेळके यांना या कार्यक्रमाविषयी कळल्यानंतर त्यांनी पुण्यातून ध्वनिफितीद्वारे या मंडळींना शुभेच्छा पाठविल्या. यामुळे 'संवाद'च्या मंडळींना प्रोत्साहन मिळालं.

मुंबईतील धावपळीच्या जीवनात वाचनाला फारसा वेळ मिळत नाही. एका साहित्यिकाची सर्व पुस्तके वाचायला वेळ मिळणं हेही मुश्किल होऊ लागलं आहे. त्यावर उपाय म्हणून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. प्रत्येकजण महिन्यातील एक दिवस साहित्यासाठी राखून ठेवतो. दिवसभर आपलं काम आटपून ही मंडळी सायंकाळी नेहरू सेंटरमध्ये जमतात. प्रमोद बापट, आनंद गाडगीळ, सुबोध केंभावी, विजय कदम, वैभव चाळके, सुशांत देवळेकर आदी मंडळी साहित्यावरील ही चर्चा घडवून आणतात. त्यांच्या अनोख्या उपक्रमातून वाचनसंस्कृती टिकविण्याचा आणि ती वाढविण्याचा उद्देश सफल होतो.

पुण्यात साहित्याविषयी आवड जोपासण्यासाठी अनुकुल वातावरण आहे. सायंकाळ झाली की मॅजेस्टिकपासून ते भांडारकर रोडवरील एखाद्या देशपांडे काकूंच्या घरापर्यंत साहित्यप्रेमींच्या मफिली रंगतात. कधी नाट्यवाचन, कधी कथा-कविता वाचन तर कधी तरी ना. धों. महानोरांच्या अस्सल ग्रामीण शब्दातील गाण्यांचा कार्यक्रम अनेकांना मोहून सोडतो. मुंबईत मात्र सायंकाळ झाली की रेल्वेच्या डब्यात घुसू न देणाऱ्या गर्दीचा एक भाग बनण्याऐवजी घरात स्वत:ला कोंडून घेण्याकडंच अनेकांचा कल असतो. त्यातही साहित्याविषयी आवड असणारे नाहीत असे नाही. मात्र, वेळ व मैफल यांचा ताळमेळ जुळत नसल्यानं त्यांची घुसमट होते. त्यांच्यासाठी संवाद नेहमीच सज्ज आहे.

संपर्क : प्रमोद बापट : २८९७ २७११

संजय व्हनमाने, (म.टा वरून)






# धागे

**पुस्तक परिचय**

## गुलजार


**संपादन :अनंत दीक्षित**

**गुलजार यांनी उलगडून दाखवलेले आपल्या व्यक्तिमत्त्वाचे व विचारांचे धागे**

दिग्दर्शक, पटकथालेखक, गीतकार, चित्रकार - एक कलावंत म्हणून गुलजार सर्वपरिचित आहेत. मुंबईत वास्तव्य असल्याने त्यांचे मराठीशीही भावबंध दृढ झाले आहेत. त्यांची साहित्यसंमेलनातील व अन्य कार्यक्रमातली उपस्थिती संस्मरणीय ठरली आहे. मराठीतील अनेक लेखककवींशी त्यांची जानपहचान आहे; आणि त्यांची काही पुस्तकेही मराठीत आलेली आहेत. 'धागे' हे त्यांचे नवे पुस्तक प्रथम मराठीत येत आहे आणि हिंदी व अन्य भाषांत ते नंतर प्रसिद्ध होईल; ही बाबही लक्षात घेण्यासारखी आहे. 'धागे'चे प्रकाशन प्रथम मराठीत व्हायचे एक विशेष कारण आहे. रविवार सकाळ मध्ये यातील लेख सदररूपाने आधी आले; आणि ते लिहून घेण्यामध्ये सकाळचे संपादक अनंत दीक्षित यांचा मोठा वाटा आहे. गुलजार यांनी सकाळसाठी सदर लिहावे असा प्रस्ताव मांडल्यावर त्यांनी एक अटच घातली.'' तुम्ही माझ्याकडं यायचं. आपण बोलायचं. ते बालणंच सकाळच्या वाचकांच्या हाती तुम्ही द्यायचं.'' आणि अनंतराव दीक्षित वर्षभर गुलजार यांच्या भेटीला मुंबईला जात राहिले; त्यांच्याशी बोलत राहिले; आणि त्या गप्पांचे सार मराठीत ललित लेखाच्या रूपात मांडत राहिले. म्हणजे एका अर्थाने हे दीक्षितांनी केलेले शब्दांकनच आहे.

अनंतराव दीक्षितांना या भेटीतून आणि गप्पांतून गुलजार यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक धागेदोरे गवसले. प्रत्येक भेटीनंतर आपण अधिक श्रीमंत झाल्याचा साक्षात्कार त्यांना होत गेला. गुलजार यांच्यातला माणूस, त्यांच्या मनाचा तरलपणा, दैनंदिन घटनांच्या संदर्भात त्यांच्या अंत:करणात उठणारे भावतरंग, त्यांच्या कविप्रकृतीचा पदोपदी येणारा प्रत्यय, त्यांची निसर्गाशी असणारी जवळीक, त्यांची दृष्टी या सर्वांवर या भेटीगाठीतून प्रकाश पडत राहिला. त्यांची थोडीफार झलक या २३ लेखांमध्ये दिसते.

गुलजार यांची काव्यात्मक वृत्ती प्रथमदर्शनीच आपले लक्ष वेधून घेते. ''भर उकाड्यात वाऱ्याची झुळूक येते. मन क्षणभर सुखावते. वारा घन असतो. वाऱ्यात मन असते. वारा भावना घेऊन येतो. काही भावना निर्माण करतो. वारा विचारांचाही असतो...मांगल्याचा असतो. विनाशाचा असतो...माणसाच्या गाभाऱ्यात सतत वाहता वारा असतो...'' अशी पहिल्याच



## गुलजार यांच्यातला माणूस, त्यांच्या मनाचा तरलपणा, दैनंदिन घटनांच्या संदर्भात त्यांच्या अंतःकरणात उठणारे भावतरंग

लेखाची सुरुवात...त्यातल्या कल्पनेच्या भराऱ्या...चिंतनाच्या लहरी...हे काहीतरी वेगळे रसायन असावे असे मनाला चाटून जाते.

या पुस्तकाचे (व सदराचे) नाव धागे हे कुठून आले असावे? त्याचाही उलगडा आरंभीच्या परिच्छेदातच होतो. 'मनाच्या घरट्यातील सूर...या सुरांचे किंवा बेसुरांचे धागे बनतात...धागा सुटा असतो. स्वतंत्र असतो तसाच एकमेकात गुंतलेला असतो. धाग्यांचीच वीण तयार होते...धाग्यांना आत्मरूप असते. रंग, गंध, आकार असतो. कधी यातलं काहीच नसतं. पण धागा असतोच. गुंफत आणं किंवा उसवणं.धाग्याचं एक टोक तरी हातात असणं कारण कधी कधी गुंता होतो...मग उसवाउसव चालते...' असे सांगता सांगता गुलजार आपल्या एका कवितेच्या ओळी उद्धृत करतात :


जब भी धागा टूट गया या खत्म हुआ
और सिरा जोड दे उसमें
आगे बुनने लगते हो
सारी गर्दी साफ नजर आती हे यहाँ से।

आज जगण्यात धाग्याचं एखादं टोकही हाती येणं मुश्किल झालंय असं म्हणता म्हणताच ते धागा माझा नसतो, तुमचाही नसतो; पण कोणापर्यंतही जायचे झाले तर धागा लागतोच असे सत्य उघड करतात.

पुढे हे धागा पुराण कवितेऐवजी शेती कारखाने शहरीकरण याकडे झेपावतेय आणि वाचकांना बुचकळ्यात टाकतेय असे गुलजार यांच्याही लक्षात येते आणि सामाजिक परिवर्तनाकडे, संगीतातील नव्या लाटांकडे वळते. रविशंकर भारतीय संगीताबरोबर पाश्चात्य संगीतही सहजगत्या हाताळतात. ते धाग्याच्या गुंत्यात अडकत नाहीत. स्वच्छ मनानं आनंद, निर्मिती यातल्या बदलांना सामोरं जायला हवं असा संदेश देऊन गुलजार लेखाचा समारोप करतात.

यातील काही लेख आत्मकथनात्मक आहेत. आपल्याला कवितेचा लळा बालवयातच कसा लागला याची हकीकत 'कवितेची रुजवात' मध्ये येते. शाळेत भेंड्या खेळताना स्वत:च शेर रचण्याची सवय लागली. पाठांतरापेक्षा हा मार्ग सोपा असे. वय वाढलं. भेंड्या संपल्या पण कविता मनात रुजल्या असे ते म्हणतात. थोरल्या बंधूंच्या संग्रहातील जोश मलियाबादी,गालिब आणि इक्बाल यांचे काव्यसंग्रह गुलजारनी वाचले; आणि उर्दू शायरीच्या प्रेमात पडले. वाचनाची गोडी लागली. रहस्यकथांनी सुरुवात झाली. बकिमचंद्र, प्रेमचंद, टागोर, शरच्चंद्र यांची पुस्तके झपाटून टाकणारी ठरली. मॅट्रिकच्या आधी त्यांची सगळी पुस्तके वाचून झाली. पंजाबी कविता, लोकगीत, गुरुवाणी यांचा प्रभावही पडत गेला. शेजारी बंगाली कुटुंब राहायचे. पुढे बंगाली मित्रही खूप मिळाले. कुसुमाग्रज, वसंतराव देशपांडे, पु. ल. देशपांडे, दिलीप चित्रे - यांच्याद्वारे मराठीची ओढ वाटली. ''मी पंजाबचा आहे. बंगालवर प्रेम करतो. दिल्ली-उत्तर





## माझ्या कवितेवर बंगाली झळाळी आहे. जिभेवर उर्दू मुळामध्ये पंजाबी, काळजात बंगाली आणि श्वासात मराठी अशी माझी वीण.

प्रदेशात वाढलो महाराष्ट्रात राहतो...माझ्या कवितेवर बंगाली झळाळी आहे. जिभेवर उर्दू मुळामध्ये पंजाबी, काळजात बंगाली आणि श्वासात मराठी अशी माझी वीण.''(१७) आजकाल मुंबईत उत्तम मराठी ऐकायला मिळत नाही, अशी तक्रारही ते 'माझी मुंबई' मध्ये करतात.(६७)

आत्मशोधाच्या वाटेवर या लेखात गुलजार म्हणतात, ''ज्ञान ही माझी बांधिलकी नसेल तर मी आधुनिक होऊ शकेन का?... केवळ ज्ञान आहे म्हणून आपोआप बांधिलकी येत नाही. केवळ ज्ञानानं श्रद्धेचा विकास असंभव आहे. वाचन, ज्ञान, जाणीव यांनी माणसाचं वागणं बदलतं. आधुनिकतेचा संबंध मनाशी असतो, हे अनेकदा आपण विसरतो...वेषभूषेवर आधुनिकता ठरत नसते.''(२१).

भूषण सबरवाल, राही यासारख्या जिवलग मित्रांच्या मृत्यूमुळे मनात उठलेल्या वादळांबद्दल 'एक कविता नदीत पडली' या लेखात त्यांनी लिहिले आहे. मृत्यूकडे आपण उदात्ततेनं बघतो. आपली संस्कृती मृत्यूकडे निर्भयपणे पहावे असा संस्कार आपल्यावर करते. महाभारतात युधिष्ठिराने म्हटले आहे, ''आपण मरणार हे प्रत्येकाला ठाऊक असले तरी आणसं नवनवं आयुष्य कसं घडवतात - हा प्रश्न मला हैराण करतो.'' राहीच्या मृत्यूनंतर गुलजार यांनी एक कविता लिहिली. आनंद चित्रपटात त्यांनी 'मौत, तू एक कविता है' असे गीत लिहिले. पर्वतापलीकडे प्रचंड समुद्र आहे. ऐलतीरावर आपण आहोत. नावेने मधली नदी पार करायची आहे. सीमारेषेवर मृत्यू नावाचा श्लोक आहे...बघता बघता पाण्यात कवितेचे शब्द विलीन होतात आणि कवितेचा अर्थ पाण्यावर तरंगत राहतो.''(६४)

कवितेचा जन्म कसा होतो? कविता केव्हा येते, कोठून येते हे अनेकदा कळतही नाही. एखाद्या क्षणी एखादे वाक्य, एखादा शब्द मनभर झळाळू लागतो...झाडाला बांधलेल्या झोक्याने पान हलावे...तसेच काहीतरी होते. काश्मीरमधे हिंडताना सलीम आरिफ हा मित्र म्हणाला, ''ऐसा लगता है कि कश्मीरका गला किसीने दबाए रखा है'' आणि त्याचवेळी एक टॅक्सी ड्रायव्हर त्यांना म्हणतो, मायग्रेटिंग बर्डस भी आजकल यहाँ नही आते. उन्हे भी पता चला है कि यहाँ की हवा में खून भरा हुआ है.'' गुलजार यांच्या मनातली काश्मीरची कविता त्यावेळी उद्रेकासारखी बाहेर येते.

ज्ञानेश्वर मुळे यांच्या 'माती, पंख आणि आकाश' या आत्मकथनाची त्यांना मोहिनी पडते. मुळे यांच्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाला ते येतात. चित्रकार - अभिनेते चंद्रकांत आणि रवींद्र मेस्त्री यांचे स्मरण त्यांना कोल्हापूरच्या दुसऱ्या भेटीच्या वेळी अपरिहार्यपणे होते. या दोघांशी झालेल्या गप्पांमुळे आपले आयुष्य समृद्ध झाले असे ते मोकळेपणाने सांगतात. कोल्हापूर महापालिकेने मानपत्र देऊन अनंतराव दीक्षित यांचा सत्कार केला. त्या समारंभाचे पाहुणे म्हणून गुलजार आत्मीयतेने येतात. बांधिलकी मानणाऱ्या पत्रकाराचा गौरव होणे ही गोष्ट त्यांना दिलासा देणारी वाटते. महाराष्ट्रातील संतपरंपरेची, विशेषत: नामदेवांची त्यांना फार



## एखाद्या फुलपाखरासारखं गुलजारांचं बोलणं या विषयावरून त्या विषयावर कमी जास्त वेळ रेंगाळत राहतं.

महती वाटते.

पावसाची विविध रूपे गुलजार यांना मुग्ध करतात. पाऊस...ही सृष्टीची भाषाच होय असे त्यांना वाटते. त्यावर दोन लेख आहेत. पावसामुळे वेगळ्या अर्थानं विश्वरूपदर्शनाची गुहा उघडते... पाऊस क्वचितच चौकशी केल्यासारखा येतो. पावसाच्या प्रत्येक थेंबात आकांक्षा असते...मृद्‌गंध ही चैतन्याची नांदी असते . पाऊस हा आपला सहचर आहे, अल्लड खेळाडू सहचर आहे असे त्यांना वाटते. आपणही पाऊसच होऊन जावे असे मग ते म्हणतात. (५९)

सुटीच्या काळातल्या गमतीजमती आठवताना निसर्गाच्या विशाल अवकाशात किती थरार असते हे ते सांगतात. शाळेच्या वर्गापेक्षा सुटीत होणारे शिक्षण अधिक व्यापक असते असा त्यांचा अनुभव आहे. मुलांकडूनही मोठ्या माणसांना अनेक गोष्टी शिकता येतात - यावरही त्यांचा भर आहे.

गुजरातचा भूकंप, अकरा सप्टेंबरचे अमेरिकेतील दहशतवादी हल्ले, या निमित्तानेही काही चिंतनपर विचार गुलजार मांडतात.

एखाद्या फुलपाखरासारखं गुलजारांचं बोलणं या विषयावरून त्या विषयावर कमी जास्त वेळ रेंगाळत राहतं. एखाद्या विषयाचं खोलात जाऊन सर्वांगीण अवलोकन करावं, त्यात अवगाहन करावं हा हव्यास त्यांच्यात दिसत नाही. हे सगळे स्वैर स्वच्छंद चिंतन आहे. ते सहजी विषयांतर करत इकडेतिकडे चार हात मारते. सुभाषितवजा वाक्यांची पखरण करते.

* आकाशाचे रंग सतत बदलत असतात. मग परिस्थिती का नाही बदलणार?

* बदल रांगेने येत नसतात. रांग तोडून मुलं सरसावतात,तसा काही बदलांचा स्वभाव असतो.

* बदलामागे अनेक प्रकारच्या प्रेरणा असतात. म्हणून बदलही गरजही असते. बदलाची नाळ विकासाशी जोडलेली हवी

* माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट...अशा साधनांच्या विकासातच आपल्या सर्व दिशा आहेत अशी मानसिकता वाढली आहे.

* गुंतागुंतीचे धागे सोडवणे हीच बदलाची खरी प्रेरणा संभवते.

* आपणच आपले सूत्रधार हे जाणिवेचं पहिलं पाऊल.

* आपण अक्षरांचे साक्षर करीत फिरत असतो. भावभावनांच्या साक्षरतेचा प्रश्न अजून गुंतागुंतीचाच आहे.

* शब्दार्थ, भाषेचा आशय व दिशा महत्वाची की अक्षराचं वळणदारपण महत्त्वाचं? सुंदर हस्ताक्षर असावं असं मला वाटतं. पण संस्कृती वरवरच्या धाग्यांनी विणता येत नाही.

* आपला भारत भावनाशील आहे. पण भावनाशीलतेत सातत्य नाही.

गीतकार गुलजार यांच्या चाहत्यांना 'त्रिवेणी'नंतरची ही त्यांची भेट ही हवीहवीशी वाटेल.

**पृष्ठे : ९३ किंमत : ६० रु. सभासदांना : ४५ रु. पोस्टेज : २० रु.**



# सरत्या सरी

### वि. स. खांडेकर

**संपा : सुनीलकुमार लवटे**




**खांडेकरांच्या लेखणीतून उतरलेल्या अगदी अखेरच्या आठ कथा**

ज्ञानपीठाचे मानकरी भाऊसाहेब खांडेकर यांच्या निरनिराळ्या नियतकालिकातून प्रकाशित पण पुस्तकरूपात न आलेल्या कथा-लघुनिबंध वगैरे साहित्याचा शोध घेऊन ते पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प कोल्हापूरचे अभ्यासक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी हाती घेतला आहे. त्या प्रकल्पाला खांडेकर रजत-स्मृती पुष्प असे नाव दिले आहे. त्या अंतर्गत सरत्या सरी आणि भाऊबीज या दोन कथासंग्रहांचे नुकतेच प्रकाशन झाले आहे. या आधी 'स्वप्न आणि सत्य'तसेच 'विकसन' हे दोन असेच संग्रह निघालेले होते. या चार संग्रहात मिळून एकूण ४३ कथा आलेल्या आहेत.

'सरत्या सरी' या संग्रहात खांडेकरांच्या अगदी अखेरच्या म्हणता येतील अशा आठ कथांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. १९७४ ते १९७६ मध्ये या कथा सुगंध, दीपावली, अनुराधा, रविवार सकाळ, गृहलक्ष्मी आणि पुढारी यामध्ये छापून आलेल्या होत्या. 'सरत्या सरी' हे अत्यंत समर्पक शीर्षक या पुस्तकाला खांडेकरांनीच दिलेले होते. पावसाच्या मुसळधार सरी ओसरल्यावर कधी कधी आल्हाददायक शिडकावा करणाऱ्या सरत्या सरी कोसळतात. त्यांच्या आगेमागे वीजांचा कडकडाट व वळवाचा रूद्रभीषण खणखणाट नसतो. तर त्यांचा सडा मंद वायुलहरींची दरवळ सर्वदूर पसरवतो. तशा या कथा आहेत. सरत्या सरींसारख्या. खांडेकरांच्या प्रतिभेचे उत्तुंग आविष्कार 'ययाती' पर्यंत होऊन गेले. पुढे जे काही संपादकांच्या वा दिवाळी अंकांच्या आग्रहामुळे लिहून झाले, ते या सरत्या सरींच्या रूपाने आपल्यासमोर येते आहे.

या सरत्या सरींमध्येही समकालीन संदर्भ व पाश्वभूमी यांचा खांडेकर वापर करतात; आणि आपल्या परीने आपली अगतिकता वा असहायता ते प्रकट करतात. एका अर्थाने ती समकालीन समाजाचीच अगतिकता आणि असहायता असते.

१९७३ साली महाराष्ट्रात अभूतपूर्व दुष्काळ पडला. त्या पार्श्वभूमीवरची दुष्काळ ही कथा सुगंधच्या १९७४ च्या दिवाळी अंकात आली.

१९७५ हे जागतिक महिला वर्ष म्हणून साजरे झाले. त्यानिमित्ताने 'मुलाखत' या कथेत



**खांडेकरांची जी जीवनदृष्टी आहे ती वेगवेगळया प्रकारे समाजघटितांचा वेध घेत असते.**

त्यांनी तथाकथित यशस्वी व उच्चसत्तापदी मिरवणाऱ्या स्त्रियांचा झगमगाट आणि सर्वसामान्य आयुष्यातही अचाट धैर्य-धाडस व जीवनाकांक्षा दाखवणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्यातील संघर्ष यांचा एक अंतर्मुख करणारा पट त्यांनी उभा केला आहे. अर्थात समकालीन घटनांच्या पार्श्वभूमीचा वापर केला म्हणून या कथांना मोल लाभलेले आहे असे नाही. खांडेकरांची जी जीवनदृष्टी आहे ती वेगवेगळ्या प्रकारे समाजधटितांचा वेध घेत असते; आणि समकालीन घटनांप्रमाणे जुन्या वा प्राचीन घटनांचाही नवा अन्वयार्थ लावत असते. या संग्रहातील प्रतिमा ही कथा रामायणात यज्ञप्रसंगी सीतेची सुवर्णप्रतिमा बनवण्याच्या घटनेशी संबंधित आहे; सीता जिवंत असताना यज्ञात मात्र तिच्या ऐवजी तिची प्रतिमा शेजारी ठेवून पूजा करण्याची पाळी येते - याचे रामाला होणारे दु:ख खांडेकर या कथेद्वारे दाखवू पाहतात. एका परीने ही पतिपत्नीप्रेमाची कथा आहे. मिथकासारखी ती सार्वकालिक आहे.

१९७६ मध्ये 'पुढारी'च्या दिवाळी अंकात आलेल्या 'घर' या कथेत खांडेकरांच्या कथातंत्राचे चिरपरिचित रूपे समोर येते. रस्तारूंदीत घर जाणार म्हणून बेचैन झालेला नामा परीट आणि आपल्या भल्या मोठ्या घरात आपणास यापुढच्या काळात एकट्यानेच भुतासारखं राहावं लागणार म्हणून अस्वस्थ झालेले मास्तर - या दोहोमधील विरोध दाखवून खांडेकर मानवी जीवनविषयक काही मूलगामी भूमिका मांडू पाहतात. ''घरापेक्षा घरातली मुले माणसेच आपल्याला अधिक सोबत देतात. माणसाला खरी सोबत असते ती संसारातल्या जोडीदाराची, पोराबाळांची; भिंतींची नाही. आणि नामा परटाला आपली पत्नी, आपली नात यांच्याबद्दल अधिक आत्मीयता वाटू लागते. दिवसभर धुणे बडवणाऱ्या पत्नीच्या उशाखालच्या हाताकडे बघताना त्याचे मन भरून येते.

...परंतु खांडेकर एवढ्यावरच कथेचा शेवट करीत नाहीत. घर रस्तारुंदीत जाणार या भयाचे भूत त्याच्या मानगुटीवरून उतरलेले असले तरी नामाला पडलेल्या स्वप्नात कोपऱ्यावरला सावकार एक बंगला बने न्यारा हे गाणे म्हणत असताना पोलिस त्याला पकडून नेतात तर दुसऱ्या स्वप्नात मास्तर मुलासारखे रडत असतात आणि नामा त्यांना शांत करीत असतो.

साध्या घटनांनाही अधिक व्यापक अर्थवैभव देण्याची खांडेकरांची शैली, त्यांच्या कथांच्या आवाहकतेमध्ये भर घालत असते. दैवी चमत्कार करण्याची सिद्धी असलेल्या काकांच्या त्या सिद्धीचा फायदा अनेकांना झालेला असतो, समाजसेवा करणाऱ्या काकांच्या एकसष्टीनिमितत एकसष्टशे रुपयांची थैली देण्यात येणार अशी बातमी छापून आल्यावर त्यांचा पुतण्या त्यापैकी काही रक्कम आपल्याला मिळावी अशी मनोमन इच्छा करतो; तर त्यांचे गावकरी गावच्या पाहत विकासासाठी ती थैली मिळावी अशी गळ घालतात. ती थैली धोंडोपंतांच्या हाती देऊन सांगतात, ''मला मिळालेली ही थैली माझ्या जन्मगावाच्या सुधारणेसाठी देत आहे. माझ्या पुतण्याचा व सत्कार समितीच्या सदस्यांचा सल्ला घेऊन तिचा विनियोग करावा.''इतक्या मोठ्या रकमेची थैली पेन्शनीत निघालेले काका काहीही आढेवेढे न घेता





**सांकेतिकता, भावुकता, तरलता, जीवनलक्ष्यी वृत्ती ही त्यांची वैशिष्ट्ये या कथांमध्ये दिसतात''**

जन्मगावासाठी देतात तेव्हा सर्वांनाच त्यांच्या मोठेपणाचे कौतुक वाटते.

...प्रत्यक्षात मात्र थैलीत शंभराची एकच नोट निघते; आणि जमा झालेल्या ३१०० रुपयांपैकी तीन हजार रुपये समारंभाचा खर्च होऊन उरलेल्या शंभर रुपयांची थैलीच देण्यात येत आहे असे पत्र वाचायला मिळते. काका त्यावर हसत म्हणतात, ''माझ्या दैवी शक्तीचा चमत्कार सांगू तुम्हाला? ही थैली देण्यात आली तेव्हा माझ्या डोळ्यापुढून एक काळाकुट्ट रंगाचा लांबलचक पट्टा सरकून गेला.''

एकसष्टीसारख्या सत्कारांचे आज पेवच फुटले आहे. त्यात अशाही काही लटपटी होत असतात. खांडेकरांच्या उपरोधाला अशा निमित्ताने धार चढत असावी. दैवी शक्ती अंगी असल्याबद्दल ख्याती असणाऱ्याचीही बाजारातली पत जेवढ्यास तेवढीच असते. आणि कुणाला काही लॉटरी लागणार म्हटल्यावर याचकांच्या आशाळभूत नजरा त्यावर अधाशीपणे कशा भिरभिरू लागतात हेही खांडेकर दाखवतात.

समाजातला हा ढोंगीपणा खांडेकरांनी नेहमीच खटकत राहिला आहे. दुष्काळ या कथेतही गरीब जनता दुष्काळ निवारणासाठी काकांना चारदोन आणे देते; पण श्रीमंत पुष्पाताईंना महिला मंडळाच्या सौंदर्यस्पर्धेचीच चिंता व्यग्र करत असते; असे खांडेकर दाखवतात.


खांडेकरांच्या ४६ कथासंग्रहात मिळून एकूण ३०६ लघुकथा प्रसिद्ध झाल्या. त्याशिवाय पुस्तकरूपात न आलेल्या ४५ पैकी ४३ कथा मिळवून डॉ. लवटे यांनी भाऊबीज, स्वप्न आणि सत्य, विकसन व सरत्या सरी हे चार संग्रह सिद्ध केले. त्याशिवाय 'क्षितिजस्पर्श'द्वारे त्यांच्या रूपककथांचेही प्रकाशन केले गेले. १९१९ ते १९७६ या ५७ वर्षांच्या कालखंडात खांडेकरांच्या कथालेखनाचा झपाटा कमीअधिक सातत्याने कायमच राहिला.

'सरत्या सरी' मधील कथांमधून खांडेकर ''समग्र जीवन उभे न करता, जीवनाचे काही प्रश्न चित्रित करताना दिसतात; सांकेतिकता, भावुकता, तरलता, जीवनलक्ष्यी वृत्ती ही त्यांची वैशिष्ट्ये या कथांमध्ये दिसतात'' - असे डॉ. लवटे यांनी म्हटले आहे;

खांडेकरांच्या कथांचे शेवट नवे कल्लोळ, नवे संभ्रम, समस्यांचे नवे आकलन, नवी अस्वस्थता निर्माण करणारे असतात.

आजही या कथा वाचकाला अस्वस्थ करतात. अंतर्मुख करतात. समाजातील विषमता आणि संवेदनशून्यता त्या कथांमधून दिसते; पण त्यामुळे खांडेकर निराश वा हताश होत नाहीत. साध्याभोळ्या माणसांच्या अंगच्या अंगभूत चांगुलपणाने, माणुसकीच्या दर्शनाने ते अंतर्बाह्य ढवळून निघतात; आणि वाचकांनाही ढवळून काढतात. त्यामुळे आकृतिबंधाचा वा कृत्रिमतेचा बडिवार दृष्टिआड होतो आणि उरतो तो मानवी सद्भावनांचा संजीवक आश्वासक उद्घोष.

**पृष्ठे : ६४ किंमत : ५० रु. सभासदांना : ३८ रु. पोस्टेज : २० रु.**




# उगवती मने

**आनंद यादव**

**मुलांच्या उगवत्या मनांचे आणि त्यांच्यावर निर्भर असणाऱ्या प्रौढांच्या वैविध्य चितारणाऱ्या कथा**

आनंद यादव यांनी लहान मुलांच्या मनोविश्वाचे आणि मुलांच्या संदर्भातील मोठ्या माणसांच्या भावभावनांचे दर्शन घडवणाऱ्या अनेक कथा लिहिल्या आहेत. त्यांचा स्वतंत्र संग्रह 'उगवती मने' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. कुटुंबात मुलांचा वावर असणे, वंशाला दिवा असणे, घराण्यात पुरुषांची संख्या भरपूर असणे याला भारतीय समाजव्यवस्थेत विशिष्ट भावनिक आणि आर्थिक महत्त्व आहे. निपुत्रिक स्त्रीच्या वाट्याला अवहेलना येत असे. आता आतापर्यंत एखाद्या स्त्रीला जर मुलीच होत असतील तर पुरुष दुसऱ्या लग्नाचा घाट घालत असत; आणि वंशाला दिवा हवा म्हणून प्रयत्न करीत असत. परंतु स्त्री-पुरुष गुणसूत्रांच्या संदर्भात झालेल्या संशोधनातून आता अपत्याचे लिंग हे पुरुषाच्या क्रोमोसोममधील 'एक्स' या क्रोमोसोमवर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाल्यावर स्त्रीवर या संदर्भातले खापर फोडणे कमी झाले आहे. ग्रामीण भागात अजूनही जुना समज रूढ असला तर नवल नाही. पिढ्यानुपिढ्यांच्या दृढ समजुती सहजी दूर होत नाहीत. आनंद यादव यांच्या कथांमधून मुलांच्या मनोविश्वाबरोबरच मुलांशी निगडित असणाऱ्या घरातल्या मोठ्या माणसांच्या आशा आकांक्षांचे देखील दर्शन घडते; दारिद्र्य, उपासमार, लोकश्रद्धा, विशिष्ट जीवनशैली, भावंडांचे स्वभाव, पोरकेपण, सावत्रपण, घराघरातली सुप्त स्पर्धा - अशा घटकांचाही प्रभाव पडत असतोच. ''घराघरातली, आसपासची, निरनिराळ्या थरातील विविध परिस्थितीतील मुलांच्या भावभावना, त्याचं अजाण वर्तन,निरागस तर्कशास्त्र अनुभवताना प्रौढमनही चक्रावून जाते.''

अशा चक्रावलेल्या प्रौढ व्यक्तींच्या मनातली घालमेल आनंद यादव चितारतात; त्याचप्रमाणे ज्या घरात बालकांचा वावर नाही; किंवा बालके आहेत पण त्यांच्याकडे लक्ष देणारे बाई माणूस नाही - त्यांचीही जडणघडण कशी होते याचेही काही नमुने त्यांना कथारूपात पेश करावेसे वाटतात. काही वेळा मुलांना मोठ्या माणसांनी धडे देण्याऐवजी मुलेच मोठ्या माणसांना जीवनाचे अगम्य कप्पे उलगडून दाखवतात. अनेक मुले स्वत:च्या पृथगात्म व्यक्तिमत्त्वानिशीच या जगात येतात आणि आपले वेगळेपण वेळीअवेळी प्रकट करीतच आपले अस्तित्व





**कथांमधून मुलांच्या मनोविश्वाबरोबरच मुलांशी निगडित असणाऱ्या घरातल्या मोठ्या माणसांच्या आशा आकांक्षांचे देखील दर्शन घडते.**

अवतीभवतीच्या परिसरावर ठसवतात.

आनंद यादव यांचा बालमनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'सार्त्रचा पुत्र' या कथेत चपखल उतरला आहे.

कथा निवेदकाचा सर्वात धाकटा मुलगा वयाच्या आठव्या महिन्यापासून आपले स्वत:चे अनुभवविश्व घडवू लागल्याचे त्यांच्या लक्षात येते. उकाड्यामुळे अंगावर कपडे न घालता तो सर्वत्र संचार करतो. अंडरवेअरवर हिंडणाऱ्या आपल्या बाबांना तो म्हणतो, ''तुम्हीही चड्डी काढून टाका ना बाबा.'' तो जेव्हा त्यांच्या चड्डीशी झोंबू लागतो तेव्हा त्यांना आपल्या सर्वस्वहरणाची काळजी वाटू लागते आणि त्याची एक सूक्ष्मशी भीतीही वाटू लागते. स्वत:ला संस्कृतियुक्त मानणाऱ्या बाबांना हा पोर आपल्याला हिणवतो आहे असे वाटते. आपल्याबरोबर आपली सावली कशी हिंडते याचे त्याला कौतुक वाटते. आपले आईबाबा दोघे शाळेत जातात ते बघून तोही खेळाखेळात शाळेला येतो असा हट्ट धरतो. अक्षरे उच्चारण्याची युक्ती त्याची जीभ स्वतंत्रपणे आत्मसात करते आणि त्याचे गोड बोबडे शब्द झाडांना पालवी फुटावी तसे उमटू लागतात. अनुकरण करता करताच तो स्वतंत्र भाषा घडवू लागतो. नवे भाषासंकेत तयार करू लागला. बाबांसारखे पेपर तपासू लागतो. गावाकडच्या प्रवासात तो एसटीतून हात बाहेर काढतो तेव्हा ड्रायव्हर ओरडतो. त्यावर हा पोर नंतर बाबांना म्हणतो, ''तो ड्रायव्हरकाका आहे ना, तो सारखा हात बाहेर काढतोय. त्याच्यावर ओरडा ना!'' - इतरांच्या वागण्यातल्या विसंगती टिपण्याची सवयच त्याला लागते. बाबांकडे तो बिस्किट मागतो, तेव्हा बाबा म्हणतात, ''आता बिस्किट नाही. मला उगीच त्रास देऊ नकोस''तेव्हा तो रडव्या आवाजात म्हणतो, ''बाबा, मी सांगितलेलं तुम्ही का ऐकत नाही? का मला उगीच त्रास देता ? द्या ना बिस्किट.''परगावाहून येताना मी तुला चिक्की आणीन असे बाबा आश्वासन देतात. पण ते कामाच्या गडबडीत चिक्की आणायला विसरतात. तेव्हा हा पोर बाबांची भूमिका करतो. ट्रिंग ट्रिंग करीत गावाहून आल्यावर बाबांना म्हणतो, ''बाबा, मी खूप गडबडीत होतो. पण मी तुमच्यासाठी गोळ्या, चॉकेलेट, चिक्की...सगळं आणलंय.''

या अशा मुलांकडे बघताना सार्त्रच्या स्वातंत्र्य कल्पनेचे आणि कलात्मक अलिप्ततेचे स्मरण निवेदकाला होते. 'स्वत:ला आलेल्या व्यावहारिक अनुभवापासून संपूर्ण अलिप्त आणि स्वतंत्र होऊन त्या अनुभवाकडे एका कलावस्तूचं मूळ द्रव्य म्हणून बघायचं; असं करताना आपल्या गुंतलेल्या भावनांचा विचार न करता त्याच्या संपूर्ण शक्यता एक मूलद्रव्य म्हणून तपासायच्या...कलात्मक अलिप्तता असल्याशिवाय कलानिर्मिती असंभव - हे सगळे या मुलाच्या उत्स्फूर्त वर्तनातून उलगडत जाते असे निवेदकाला वाटते. एवढेच नव्हे तर आपण कायदे, नियम, रीती, परंपरा, कौटुंबिक संबंध; नीति - प्रतिष्ठेच्या कल्पना यांची अंतर्गत परस्पर विसंगत ओझी डोक्यावर वागवतो; एखाद्या गुलामाप्रमाणे स्वत:ला वागवतो आणि या



## मुलांकडे बघताना मला परमेश्वर, सार्त्र आणि संस्कृतीच्या पोशाखापूर्वीचा आदिम, नागडा, ताजा मानव

मुलालाही त्यात गुंतवू पाहतो. या नेमक्या विसंगतीवर हा बालतत्त्वज्ञ बोट ठेवतो आहे अशीही जाणीव होते. तो सार्त्रच्या स्वातंत्र्याचा खरा अनुभव हा पोर घेतो आहे, मनाला वाटेल तेव्हा तो बाबा होतो, आई होतो, ताई होतो, ड्रायव्हर होतो, पाहुणा होतो.. आणि निवेदक बाबाला वाटते, ''मुलांकडे बघताना मला परमेश्वर, सार्त्र आणि संस्कृतीच्या पोशाखापूर्वीचा आदिम, नागडा, ताजा मानव एकत्र दिसतो.''

'आभाळाघरचे वैरी' चा निवेदकही आन्दाच आहे. शेतात भरपूर पीक येईल अशी स्वप्नं बघणाऱ्या शेतकरी कुटुंबाची पाखरं परवड करीत हा अनुभव त्यात आन्दाच्या मुखातून वदवला आहे. पेरूच्या झाडाला पेरू लागले की पाचसात पोपटांचा थवा नेमका हजर होई. पोपटांनी चोच मारलेली अर्धीकच्ची फळं काढून टाकावीत असं आन्दाला वाटे. तेव्हा बाबा त्याला अडवून म्हणत, ''नको, राघवाची जात आधल्यादिशी खाल्लेलंच फळ पुन्ना दुसऱ्या दिवशी येऊन खाती. तवर बाकीची फळं शाबूत ऱ्हातील...'' तरीही आन्दा कधी कधी दगड मारी. नेम चुके. पाखरं अलगद उडून जात. आंब्याच्या झाडावर रात्री वटवाघळे येत. शेतात जोंधळ्याची कणसं भरून आली की पाखरांची पलटणही हजर होई. गोफणीनं त्यांना पळवून लावायचं तर उंच माळा हवा. पण माळ्याचा नुसता कनकावळा उभा करून आन्दाची गोफणगिरी चाले. आणि तीस पोती जोंधळा येईल असा अंदाज असताना दहा पोतीच हाती पडत. तेव्हा बाबा आन्दाला रागावून म्हणे,''सुक्काळीच्या! तरी तुला सांगत हुतो. जरा इल्लंतं पाखरं राख म्हणून. तू नुसता शेजारपाजारच्या पोरासंगं खेळच मांडून बसतोस. शेतकऱ्याच्या पोराला आलाईस का बेलदाराच्या?...जरा तरी शेतकऱ्याचं वळाण उचलकी. न्हाई तर भीक मागत हिंडशील जलमभर!''

आईवडिलांना पारखा झालेला यशवंता - त्याचा सांभाळ आबा करतात. मृत्यूशय्येवर असताना त्यांना पाच वर्षे वयाच्या या यशवंताचे पुढे कसे होणार हीच एक चिंता लागून राहिलेली असते. आबांचे निधन झाल्यावर त्यांना आंघोळीसाठी खोलीतून बाहेर आणले जाते. तिरडीवर गच्च बांधलेल्या खुर्चीवर बसवण्यात येते. शेवटच्या दर्शनासाठी यशवंताला समोर आणण्यात येते. आबांना असं नटलेलं बघून गणपतीच बसवलाय असे वाटते. तो एकदम ओरडतो,''गणपती बाप्पा मोरया.''

यशवंताच्या निरागस बालमनाचे असे चित्रण बाप्पा या कथेत वाचायला मिळते.

तर 'काळा धागा'या कथेत पणतूच्या रूपाने येणाऱ्या वंशसातत्याचे औत्सुक्य दिसते. शंभरीच्या घरात पोचलेल्या म्हातारीला अनेक नवसासायांसांनी होत असलेल्या आपल्या पणतूच्या आगमनानं कितीतरी काळानं असू येते आणि पणतूचा चिमुकला चेहरा सिद्धेश्वराच्या चेहऱ्यासारखा असल्याचे जाणवते. ''बाबा म्हादेवा, चोवीस तास तुझी आता सोवळ्यानं सेवा





## आनंद यादव या कथेतले ग्रामीण वातावरण प्रभावी ढंगाने व्यक्त करण्यासाठी गावरान शब्दप्रयोग करतात. अफलातून तपशील देतात.

करीत. काशीला न्ह्यायला हाडं मोकळी कर बाबा आता...''अशी प्रार्थना ती करते... चाळिशीच्या घरात गेल्यावर आपल्याला महालिंग झाला त्यावेळचे स्मरण तिला होते; महालिंगला पाच अपत्ये झाली. दोन मुले; तीन मुली. त्यांनी वाडा भरला. तिची नातवंडं रांगत खोड्या करीत तिचं सोवळं विटाळू लागली. पण थोरल्या नातसुनेला लग्नानंतरच्या आठदहा वर्षात मूल न झाल्याने ती चिंता ग्रस्त असे...आणि आपल्या आयुष्यातल्या एका भयाण काळ्या घटनेच्या आठवणीने तिची काळजी जास्तच गडद होई...त्या काळजीतून ती पणतू झाल्यावर एकदम मुक्त होते. ही काळी घटना काय तिची जळमटं पहिल्या तळाच्या खाली कुठंतरी राहिलेली असल्यानं त्याच तळमळीत तिचं सारं आयुष्य कसं गेलं या शंकेचा एक काळा धागा नातसुनेच्या डोईवर लोंबकळत असल्याचा भास तिला सारखा का होई - हे सर्व या कथेला रहस्यपूर्ण बनवते; आणि नवजात पणतूचे स्वागत करण्यास म्हातारीला बळ देते.

बाळक्या उनाडटप्पूपणा करी. नकटा घोगऱ्या आवाजाचा कदम आल्यावर आई त्याला बाहेर पिटाळते.--- बोरं हुडकत आडरानात भटकतो, गाढवांना धोंडे मारून पळवून लावतो, गोनुगड्याच्या माळवातल्या भेंड्या नि किरळ्या कराकरा खातो, भूक अनावर झाल्यावर घरी येतो; तर दार आतून बंद. आईला खूप हाका मारतो. आतून काकणांचा नि कुजबुजीचा दबका आवाज येतो. तो दाराला धडक देतो. बाहेरनं कडी लावतो. पण नंतर ती कडी उघडत नाही म्हणून रडू लागतो. आजूबाजूचे लोक गोळा होतात. कडी काढतात. विस्कटलेल्या केसांची मंजी बाहेर येऊन त्याच्या पेकटात लाथ घालते. बाप हयात नसलेलां बाळक्या - धुळीत कोलमडतो. जमलेल्या लोकांना मात्र घरात आणखी कोण आहे याचीच उत्सुकता असावी.

आनंद यादव या कथेतले ग्रामीण वातावरण प्रभावी ढंगाने व्यक्त करण्यासाठी गावरान शब्दप्रयोग करतात. अफलातून तपशील देतात.

''सुईचं टोक सरळ ढेकणांच्या पाठीत आत घुसवून बाळक्यानं ढेकणं सुईतच ओवावयाचा उद्योग सुरू केला... आपूण दांडगं झाल्यावर माणसांच्या पोटात पोती शिवायची दाभणं घुशीवणार...''

तोंड धू आदुगर ते. थुक्कीचं वरंगुळं कानापतोर गेल्यात बघ.'' (२)

''उघड्या सारणीवरनं उडी मारून रस्त्याला लागला. ह्या सारणीचा कुबट नि कुजट वास सबंध घरभर पसरलेला असायचा.''(३).

''पोटात काही नसल्याची आठवण त्याला झाली. बरं झालं त्येच्या आयला. आपूण परसाकडला गेलो न्हाई. न्हाईतर पोट लईच मोकळं मोकळं झालं असतं... त्यो कडू बेऱ्याचा आला घरात...गटार हुंगत.''(४).

आपूण साप पाळायचं. चिमण्या, उंदरं, बेडक्या मारून त्यांस्नी घालायच्या...गारड्यागत



## खूप वेगवेगळे विषय व भाव आनंद यादवांच्या या कथांद्वारे आपल्यापुढे येतात.

साप गळयात अडकून कवा तरी गावात जायाचं...त्या दाद्या कदमाच्या धोतरात हळूच साप सोडाचा. भडकाच्या घरात समदं सापच सोडून दिलं पाहिजे.'' (५)

काचेच्या कपाटात तेलकट पिवळी कांद्याची कुरकुरीत भजी त्याला दिसली. तोंडात लाळ आली. शेवेची ताटं, चिवड्याचा ढीग, त्यातली भाजलेली खोबरी, लाडवांची लगड, त्याला काचेजवळ जाऊन काचेवर जीभ लावावी असं वाटलं... पोटातली भूक आत एकदम भडकल्यागत झाली. डोसकं झिणझिणत चाललं. (९). तो धुळीत पुन्हा कोलमडला. फाटलेल्या चड्डीतनं धूळ ढुंगणाला जास्तच चटके देऊ लागली. (११)..

- ग्रामजीवनाची झलक दाखवणारे असे तपशील या पुस्तकातील सर्वच कथांमधे चिक्कार सापडतात. थोडे बोल्ड. थोडे मिस्किल.


बायको वारल्यावर, तीन वर्षाच्या मुलाची देखभाल करताना ऊसतोडणी कामगार गोंदाची तिरपीट उडते. बहीण त्याला सुचवते. कुणा गरीबाची अडलेली एखादी बाई बघून पुन्हा लग्न कर...हा विचार गोंदाला हळूहळू पटत जातो. तो पोराला सांगतो, ''काल गेलो होतो - तुला आई आणायला. ...ती तुला भाकरी करून घालील. आंघूळ घालील...जवळ घेऊन थोपडून निजवलं... मी आरामात कामाला जाईल...ती घरदार चांगलं लावल.'' पण नंतर तो मनाशीच म्हणतो, ''आणि तुला सावत्र भाऊ येतील, भणी येतील. सवतीचं वैरी येतील...मी तरी काय करू बाळा?'' - 'पोरकं घर' मधील या अगतिक गोंदाची ही घालमेल कथाकार म्हणून यादव केवळ एकांगी दाखवून थांबत नाहीत हे विशेष!

आपल्या तिन्ही सावत्र भावांना तीन तीन गुंड पोरं आहेत; पण आपल्याला मात्र नारायण आणि राधी ही दोनच - म्हणून खंतावलेल्या बाबूला सगुणा पुन्हा गरोदर राहते तेव्हा आणखी एक मुलगा व्हावा अशीच ओढ वाटते. मुलगी झाल्याचे कळल्यावर त्याच्या पायातलं बळ गेल्यागत होतं. सारखं माती खाणारा अशक्त नारायण - त्याला मग बाबू जवळ घेतो. घरात दिवा लागल्यावर सगळं घर त्या सोनेरी उजेडात भरून जातं. भिंती स्वाभिमानी दिसतात. नारायणावर खुंट्यांचे न मिटलेले डोळे स्थिर होतात.'' - वंशाचा दिवा म्हणून आपल्या अशक्त आजारी लेकरावरच सर्व आशा केंद्रित होऊन त्याचा भाव वधारतो. 'दिवा' या कथेत ही पालकांची मानसिकता बघायला मिळते.

- असे खूप वेगवेगळे विषय व भाव आनंद यादवांच्या या कथांद्वारे आपल्यापुढे येतात. कधी कधी कादंबरीचा ऐवज कथेच्या मर्यादित जागेतही सामावू बघतात.

**पृष्ठे : १५६ किंमत :१०० रु. सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**






# कथांतर

**अनु. सुनीती देशपांडे**

**रशियातील अग्रगण्य कथाकारांच्या प्रतिभेचे सुखद दर्शन घडविणाऱ्या कथा**

डोस्टोवस्की आणि टॉलस्टॉय हे कादंबरीकार आणि तुर्गनेव्ह, चक्रॉव्ह, वगैरे कथाकार यांना विश्वसाहित्यात मानाचे स्थान आहे. रशियन जीवनाचे अस्सल दर्शन घडविणाऱ्या या लेखकांच्या साहित्याचे स्वरूप हे विश्वात्मक आहे; आणि आपल्याकडील माणसांशी त्यांचीही नाळ जुळते असेच वाटत राहते.

रशियन सांस्कृतिक केंद्रात काम करणाऱ्या डॉ. सुनीती अशोक देशपांडे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये १९९२-९३ दरम्यान रशियन लेखकांच्या कथांचे अनुवाद प्रसिद्ध केले. त्यामधील वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांमुळे वाचकांचे त्यांजकडे लक्ष गेले. त्यापैकी १७ कथांचा समावेश असलेले कथांतर हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे मराठी वाचकांसमोर येत आहे. त्याला गोविंद तळवलकर यांची प्रस्तावना आहे.

शिवाजी विद्यापीठातील रशियन भाषा विभागात प्रा. ब्लादिमीर बेर यांच्या मार्गदर्शनाखाली सुनीती देशपांडे यांनी रशियन भाषेचा अभ्यास केला. १९८१ ते १९८५ या काळात रशियात जाऊन रशियन भाषेचा अधिक बारकाईने अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. नतालिया बासिस या शिक्षिकेच्या घरीच मुक्काम करून सुनीती देशपांडे यांनी रशियन भाषेत डॉक्टरेट केले. ''तू संपूर्ण भाषेत शिरायला हवेस. केवळ व्याकरण, निबंध आणि खडूफळा यात गुरफटून राहू नकोस. त्याबाहेर ये... यशस्वीरीत्या अनुवाद करू लागलीस की तुझ्या साऱ्या शिक्षणाचं सार्थक होईल.'' असा संदेश नतालिया मॅडमनी दिला होता; शिवाय त्यांनीच रेडिओ-टीव्ही, वृत्तपत्रे यांच्याशी संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घडवून, मार्गदर्शनाची व्यवस्थाही केली. भारतात परतल्यावर मुंबईच्या हाऊस ऑफ सोविएत कल्चर मध्ये प्राध्यापिका म्हणून काम मिळाले.''श्री गजाननाची साक्ष आहे. त्याच्या कृपेनं मी आज ज्या जागेवर आहे, त्यासाठी औपचारिक मुलाखतही मला द्यावी लागली नाही.'' असे त्या म्हणतात.

पुढे रशियन कथांची भाषांतरं करण्याची कल्पना मनात आला मटाने तीन कथा स्वीकारल्याचे कळवले तेव्हा 'एव्हरेस्टही ठेंगणा वाटू लागला' आणि दोन वर्षात २७ कथांचे अनुवाद तयार झाले. फुलांचे बोल हे पहिले पुस्तक दोन वर्षापूर्वी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे



**या बहुतेक कथांचे नायक हे ग्रामीण भागातले वा छोट्या गावातले आहेत. सामान्य समाजस्तरातले आहेत.**

बाजारात आले. तेही अनेकांना आवडले. त्यामुळे १७ कथांचा नवा संग्रह 'कथान्तर' या नावाने आता मेहतांतर्फेच प्रसिद्ध होत आहे.

या संग्रहातील गोगोला चेकॉव्ह, टॉलस्टॉय, सोल्झेनित्सिन यांची नावे मराठी वाचकांच्या ओळखीची आहेत. (तुर्गनेव्ह हा आद्य रशियन कथाकारांपैकी अग्रगण्य लेखक. त्याची कथा यात नाही.) बाकीची नावे फारशी आपल्याकडे ठाऊक नाहीत. परंतु त्यांच्या कथांमध्ये वेगळेपण जाणवेल. या बहुतेक कथांचे नायक हे ग्रामीण भागातले वा छोट्या गावातले आहेत. सामान्य समाजस्तरातले आहेत. चेकॉव्हच्या कथेचा नायक एक साधा कारकून आहे. नाट्यगृहात तो आपल्या वरिष्ठांच्या मागच्या रांगेत बसलेला असतो. त्याला त्यावेळी जोरात शिंक येते. त्यामुळे तो ओशाळतो. आपली नोकरी जाईल अशी भीती त्याला पछाडते. नंतर तो वरिष्ठाची पुन:पुन्हा माफी मागत राहतो. त्यामुळे तो वरिष्ठ खरा वैतागतो. खरे तर नाट्यगृहातल्या त्या प्रसंगाचे वरिष्ठाला विशेष काहीच वाटलेले नसते; पण नंतर मात्र तो संतापतो. आणि त्या धास्तीने कारकून मरण पावतो.

टालस्टॉयच्या कथेतील नायकाची अशीच गोची होते. त्याचे नृत्याच्या कार्यक्रमात भेटलेल्या एका उमराव कन्येवर प्रेम बसते. त्या नायिकेचा उमराव बाप अगत्यशील, श्रीमंत, नृत्यकुशल आणि रुबाबदार असतो. त्यामुळे नायक हर्षभरित होतो. दुसऱ्या दिवशी मात्र त्या उमरावाचे एक सरकारी अधिकारी म्हणून उग्र व अरेरावीचे वागणे पाहिल्यावर आपला याच्यापुढे निभाव लागणार नाही असे नायकाला वाटते आणि आपल्या त्या प्रेयसीपासून चार हात दूर राहणेच श्रेयस्कर असा बचावात्मक पवित्रा तो घेतो. प्रेयसीच्या तोंडाकडे बघताना त्याला तिच्या मग्रूर बापाचाच चेहरा दिसतो; आणि सैन्यात दाखल होण्याचा किंवा नोकरी करण्याचा विचारही तो डोक्यातून काढून टाकतो.

माणूस परिस्थितीच्या प्रभावाखाली येऊ शकतो; पण प्रसंगी एखादी घटनाही त्याच्या सगळ्या आयुष्याला वेगळे वळण देऊ शकते या सूत्राच्या पुष्टीसाइी नायक इवान वासिल्येविच आपली ही हकीकत सांगतो. अशा निवेदन शैलीचा वापर या कथेमध्ये करण्यात आला आहे.

वैमानिक पावेल आपल्या आईला भेटीसाठी मॉस्कोला बोलावतो. विमानाने ये, तिकिटाचे पैसे पाठवतो असे कळवतो. त्या तारेला उत्तर पाठवायचे कसे यावर दहा वर्षाचा नातू शूरका आणि त्याची आई यांच्यात खूप चर्चा होते. तारेचे शब्द साठसत्तरवर होतात; ते फारच खर्चाचे म्हणून शेवटी पत्र लिहायचे ठरते. पावेलची आई विमानाने जायची कल्पना नाकारते. उगाच जीवाशी खेळ नको म्हणते. त्या पत्राला शूरका पुस्ती जोडतो - ''आजी तयार झाली होती पण शेजारी राहणाऱ्या इमोरने भीती दाखवली...तेव्हा तिची समजून घाल. मॉस्कोला मला यायचे आहे. मित्रांशी मी पैजाही मारल्या आहेत. आता तूच मला वाचव.''

- आजी नातवामधल्या या संवादांतून त्यांच्यातले भावविश्व समोर येते. विमानप्रवासाचे व मॉस्कोसारख्या शहराचे आकर्षण खेड्यात राहणाऱ्यांना रशियात जसे वाटते, तसेच ते





**''तुम्ही लौकिकार्थानं कोणताही गुन्हा केलेला नाही. उलट पत्नीवरील प्रेमासाठी केलेले साहस अशीच त्याची नोंद देवाच्या दरबारी होईल.''**

भारतातही वाटते. त्यामुळे या कथांमधील वैमानिक, त्याची आई आणि नातू ही पात्रे आपल्या इथलीच वाटतात.

कॉंस्टंटाइन पाउतोवस्की याची 'जन्माचे झाले सोने' ही कथा एका गलितगात्र अंध म्हाताऱ्याने मृत्युशय्येवरून दिलेल्या एका चोरीच्या कबुलीची आहे. ही चोरी त्याने आपली आजारी पत्नी मार्था हिच्या औषधासाठी व आहारासाठी केलेली असते, आणि ती आपल्या सरदारीणबाईच्या घरातील सोन्याचा मुलामा दिलेल्या भांड्याची असते...या चोरीबद्दल कोणीही त्याच्यावर आळ घेत नाही.पण मार्थाही वाचत नाही. ही कबुली देण्यासाठी तो वृद्ध आपल्या मुलीला सांगतो,''रस्त्यावर जो कोणी माणूस दिसेल त्याला तू घेऊन ये. त्याला मी सर्व सांगेन'' रस्त्यावर दिसलेल्या पहिल्या माणसाला मुलगी घेऊन येते; म्हातारा कबुली देतो तेव्हा तो माणूस म्हणतो, ''तुम्ही लौकिकार्थानं कोणताही गुन्हा केलेला नाही. प्रेमाखातर तुम्ही ज़ी गोष्ट केली ती चोरी तर नाहीच; उलट पत्नीवरील प्रेमासाठी केलेले साहस अशीच त्याची नोंद देवाच्या दरबारी होईल.'' एवढंच नव्हे तर तो माणूस त्या वृद्धाला त्याची शेवटची इच्छा विचारतो. ''आपली मुलगी मरीया पोरकी होऊ नये...'' तो माणूस तिची जबाबदारी घेण्याचे मान्य करून आणखी काही हवे का विचारतो. भ्रमावस्थेत तो वृद्ध म्हणतो, ''मी दृष्टीहीन आहे. पण पहिल्या भेटीतील मार्थाला मला बघायचं आहे.'' तो माणूस मोडकळीला आलेल्या तंतुवाद्यातून अलौकिक सूर काढतो... वृद्धाला मार्थाचे दर्शन होते...पांढऱ्या शुभ्र हंसांचा थवा धावत येताना दिसतो...वृद्धाला धन्यता वाटते. आपण कोण असे तो विचारतो...''मी मोझार्ट'' मरीया ते नाव ऐकून दचकते. वाकून अभिवादन करते. वृद्धाचे प्राण पंचत्वात विलीन होतात. मोझार्ट या संगीतकाराच्या अलौकिक संगीत साधनेची ही झलक पाऊतोवस्कीच्या या कथेतून प्रकट होते. संगीताने त्या वृद्धाच्या अंतिम क्षणी त्याला स्वर्गीय अनुभूतीचा साक्षात्कार घडवला. बैजू बावरा- तानसेन यांच्यासारख्या संगीतकारांच्या दंतकथा आपण वाचतो. त्या आता कपोलकल्पित वाटू नयेत.

...नोबेल पुरस्कार विजेते अलेक्झांडर सोल्झेनित्सिन यांची कथाही एका वयोवृद्ध सैनिकाबद्दल आहे. तो दीर्घकाळ कैदी म्हणून कॅपमध्ये राहून उपचारासाठी ताश्कंदच्या रुग्णालयात आलेला आहे. त्याला तेथे अगदी तुच्छतेची वागणूक मिळते; मरणाच्या दारात पडलेल्या त्यालाही सुनावले जाते, ''आमच्याकडे फक्त ॲम्ब्युलन्समधून आलेल्या रोग्यांनाच दाखल करून घेतले जाते. तेही ठराविक वेळी. तुम्ही चालू लागा.'' सैन्यपथकात विशेष पराक्रम गाजवल्याबद्दलचे त्याचे प्रमाणपत्रही तेथील परिचारिका कागदाचे चिटोरे म्हणून फेकून देते.

स्वातंत्र्य सैनिकांना आपल्याकडेही आपल्या नोकरशाहीचे असेच अनुभव येत असतात. माणसे सगळीकडे सारखीच!

वेलेंतिन रसपूतीन हा कथाकार सध्या रशियात लोकप्रिय आहे. रुदोल्फ अधिक़ इओ बरोबर रुदोल्फिओ ही त्याची कथा तरुण इओच्या एकतर्फी प्रेमाची तरलता दाखवते. बसमध्ये



## आमच्या कष्टांची, दुर्दशेची आणि अवहेलनेची ती बोलकी साक्ष आहे.

रोज बरोबर प्रवास करणाऱ्या रुदोल्फचे लक्ष वेधून घेण्यासाठी नाना क्लृप्त्या इओ ही अल्लड तरुणी लढवते. तिच्या धिटाईने तो भांबावून जातो. ती त्याला नेहमी फोन करत राहते. कधी पहाटे. कधी रात्री. ती त्याला म्हणजे, ''रुदोल्फिओ, तुझी बायको म्हणजे मूर्तिमंत मेषपात्र आहे...मी तिच्यापेक्षा किती देखणी आहे! ''एकदा ती त्याला म्हणते,''मला तुझ्या ओठांचा स्पर्श हवाय...''तो म्हणतो,''मग माझं नातं खरं नाही?'' असं म्हणून ती त्याच्या गालावर सणसणीत चपराक ठेवून देते...त्यानंतर एकदा ती त्याच्या घरी येते; आणि सांगते,''रुदोल्फ, तू एक फडतूस माणूस आहेस. माझा रुदोल्फिओ तो - तू नाहीस....मी गेले होते मसणात. शेण खायला. तूही तिथेच जा! आणि त्याला समोर सगळं धूसर दिसू लागतं. तिची नितळ पावलं काजळीनं माखून गेली आहेत असे जाणवते.''

- जुने दुर्मिळ ग्रंथ गोळा करणाऱ्या निवेदकाला एका गावातले आगासाहेब आपल्याजवळचा दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथ दाखवतात; आणि म्हणतात, ''यातल्या प्रत्येक शब्दाची किंमत दोन उंटांएवढी आहे.'' पण तो ग्रंथ विकायला मात्र आगासाहेब तयार नसतात. चाळीस वर्षापूर्वी तो ग्रंथ त्यांनी एक उंटीण देऊन घेतला होता. त्याबद्दल त्यांच्या बायकोची रोज बोलणी खाल्ली होती. तो ग्रंथ वाचणारा कोणीही सुशिक्षित त्याकाळी त्या भागात नव्हता. त्यासाठी आपला आठ वर्षाचा मुलगा मुराद याला शिक्षणासाठी तो एका गुरूकडे ठेवतो. चार वर्षांनी आगासाहेबांना दिसते की मुराद हा साक्षर तर झालेला नाही, उलट हरकाम्या गडी म्हणून तो तेथे राबत आहे. सोविएत क्रांती होते. शिक्षण सर्वांना खुले होते. मुराद शिकतो. ते पुस्तक वाचतो. ''या पुस्तकामागं आमची कैक वर्षांची वेदना जिवंत उभी आहे. आमच्या कष्टांची, दुर्दशेची आणि अवहेलनेची ती बोलकी साक्ष आहे. तू हे पुस्तक वाच. पण माझी व त्याची ताटातूट ही कल्पनाच मला असह्य आहे.'' आगासाहेब तो ग्रंथ काही झाले तरी विकायला नकार देतात. पण एक मार्ग मात्र सुचवतात. ''भल्या गृहस्था, तुला पुस्तक आवडलं असेल तर इथं बस आणि लिहून काढ तुझ्या वहीत. ''


- निवेदक दोन आठवडे तेथे थांबून त्या ग्रंथाची प्रत तयार करतो. निवेदकाला वाटते.''आता मीही श्रीमंत ठरलो होतो. कारण ही पृथ्वीमोलाची ठेव आता माझ्या मालकीची होती... तुर्कमेनियनमधील मखुमकुली याचे ते पुस्तक अमोल होते.''

- अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण कथानकांची आणि व्यक्तिरेखांची भेट 'कथांतर'द्वारे होऊ शकेल. प्रत्येक कथाकाराची आरंभी थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. त्यात जन्म-मृत्यूच्या तारखा असत्या व त्या विशिष्ट कथेचा लेखनकाल दिला असता तर वाचकांना त्या कथांचे संदर्भ अधिक नेमकेपणाने अवगत झाले असते.

अनुवाद हा दोन सांस्कृतिक वास्तवांची झुंज लावणारा असतो. दोन संस्कृतींना जवळ आणणाला असतो. 'कथांतर'द्वारे हे जाणवावे.

**पृष्ठे : १६० किंमत :१२० रु. सभासदांना : ९० रु. पोस्टेज : २० रु.**





# श्रद्धांजली

**आजच्या स्त्रीत्वाचे युवामनाला पडणारे अवघड प्रश्न बिनधास्तपणे विचारणाऱ्या नायिका चितारणाऱ्या - गौरी देशपांडे**

पिकली पाने गळून पडतात; तेव्हा वाईट वाटते. पण प्रिया तेंडुलकर, गौरी देशपांडे यांच्यासारखी ऐन बहरातली तजेलदार पाने गळून पडतात तेव्हा फारच हळहळ वाटते.

स्त्रीच्या व्यक्ती म्हणून विचार करणारी; स्त्रीत्वाचे आत्मभान प्रकट करणारी, मनाने मुक्त झालेल्या स्त्री विषयी लिहिणारी संवेदनशील लेखिका म्हणून गेल्या पाव शतकात गौरी देशपांडे यांनी मराठी साहित्यात स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्या स्वत:ला स्त्रीवादी असे म्हणवून घेण्याचे कटाक्षाने टाळत; पुरुषसत्ताक समाजपद्धतीने होणाऱ्या अन्यायाचा पाढा वाचत बसत नसत . आपल्या लेखनाद्वारे त्यांनी आजच्या आधुनिक स्त्रीच्या स्वातंत्र्याची, स्त्री-पुरुष नात्याच्या भिन्नविभिन्न पैलूंची सहृदय रूपे पेश करून, आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या पुरुष प्रतिमेचेही नमुने वाचकांपुढे ठेवले; आणि त्यामुळे बंडखोर 'बिनधास्त', 'क्रांतिकारक' वगैरे विशेषणांनी त्यांचा उल्लेख होत राहिला. एकेक पान गळावया, थांग, दुस्तर हा घाट, तेरूओ, उत्खनन वगैरे त्यांच्या कादंबरिकांनी मध्यमवर्गीय मराठी समकालीन तरुणीला अनेक पर्यायांचा विचार करण्यास प्रवृत्त केले. विवाहानंतरही नवऱ्याशिवाय कोणा मित्राला आपल्या जीवनात स्थान असू शकते; आणि तसे ते असण्याने नवऱ्याला द्वेष-मत्सर-संताप वाटू नये; लग्न न करताही सहजीवनाचा वा मातृत्वाचा आनंद उपभोगण्यात काही गैर नाही; मात्र त्यासाठी लागणारा मनाचा खंबीरपणा तिच्यात असायला हवा; समाजाने घालून दिलेली नीतिमत्तेची पारंपारिक चौकट झुगारून देऊन स्वत:चे आयुष्य जगू पाहणारी स्त्री ही दु:खीच व्हावी असे मानायचे कारण नाही...इत्यादी इत्यादी.

नवरा विरुद्ध बायको, स्त्री विरुद्ध पुरुष अशी लढाई गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसत नाही. त्यांच्या बहुतेक कथाकादंबऱ्यांतील नवरे आपल्या बायकोला आपल्या मित्राविषयी जे काही वाटतं, त्याबद्दल कौतुक बाळगून असतात; आणि एखाद्या पुरुषाला दुसऱ्या पुरुषावर माया असू शकते, तेच तिला त्याच्याबद्दल वाटतं-' असे गौरी देशपांडे मानून चालतात. किंवा तसा त्यांचा अनुभव असावा.

गौरी देशपांडे यांच्या वैयक्तिक जीवनातही असे समंजस पुरुष आलेले असल्यामुळेच, त्यांच्या कथाकादंबऱ्यांतील पुरुषांचे चित्रण सौहार्दपूर्ण होत असावे. महर्षी अण्णासाहेब कर्वे आणि रँगलर परांजपे यांची नात, डॉ. दिनकर कर्वे - इरावती कर्वे यांची कन्या या पार्श्वपीठिकेमुळे स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा, बुद्धिवाद, अध्ययन - व्यासंग यांचे मोकळे वातावरण त्यांना लाभले. स्वत:च्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे भान झाले.

अठराव्या वर्षीच गौरी कर्वे लग्न करून गौरी देशपांडे बनल्या. विश्राम बेडेकरांच्या चिरंजीवांनी गौरी व अविनाश देशपांडे यांची ओळख करून दिली. आणि 'बऱ्यापैकी प्रेमविवाह' या सदरात मोडणारा हा विवाह झाला. लग्नानंतरही गौरीचे शिक्षण पुढे चालू राहिले. इंग्लिश घेऊन एम. ए. पूर्ण झाले. उर्मिला आणि मिथिला या दोन कन्याही झाल्या. सत्यकथेत कथा येऊ लागल्या. परंतु देशपांड्यांच्या घरात एक प्रकारची आपली घुसमट होत आहे ही भावना बळावत गेली. आपले स्वतंत्रपणे मोठे होणे हे आपल्या अहंमन्य नवऱ्याला खुपते आहे हे बघून त्यांचे स्वयंप्रज्ञ मन या संसारातून उडू लागले. आणि आईवडील विरोधात असूनही गौरी देशपांडे यांनी लग्नानंतर दहा वर्षांनी घटस्फोट घेतला. दोन मुलींपैकी एकीचा ताबा नवऱ्याकडे गेला. ती मुलगी अमेरिकेला गेली. दुसऱ्या मुलीला, उर्मिलाला घेऊन गौरी देशपांडे यांनी मुंबई गाठली. 'इलेस्ट्रेटेड वीकली' मध्ये संपादकीय विभागात नोकरी मिळवली. आर्थिक अडचणीला तोंड देत, दिवस काढले. त्यानंतर गौरी देशपांडे यांच्याच ग्रुपमधला, समवयस्क तरुण सुरिंदर हा त्यांच्याबरोबर राहू लागला. 'त्यानं आणि मी एकमेकांना अनुरूप होण्यासाठी स्वत:त बदल केले. ही लवचिकता त्याच्या आणि माझ्या स्वभावातही आहे...त्याचं घर खरं तर आर्थोडॉक्स. शीख लोक ते ! पण त्यांच्या घरातल्यांनी मला आपलं मानलं.' असं गौरी देशपांडे म्हणतात. सुरिंदर सिंग यांच्याबरोबर पंचवीसावर वर्षे त्यांचे सहजीवन सुखेनैव चालले. विधिवत लग्न झालेय की नाही हा प्रश्न त्यांना निरर्थक वाटतो. आपल्या वैयक्तिक प्रश्नांशी समाजाला काही घेणंदेणं असण्याची गरज नाही अशी त्यांची भूमिका होती. पत्रकारितेप्रमाणेच गौरी देशपांडे अध्यापनक्षेत्रातही दीर्घकाळ रमल्या. कॅनडा, दक्षिण कोरिया वगैरे देशात त्यांचे वास्तव्य झाले. त्या सर्वांचे पडसाद त्यांच्या कथाकादंबऱ्यांत उमटले. फलटणजवळच्या विंचुर्णी खेड्यात त्यांनी स्वत:साठी घर बांधले. तेथे काही काळ वास्तव्य केले. त्यावेळच्या अनुभवावरचे 'विंचुर्णीचे दिवस' हे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या भगिनी जाई निंबकर यांचे वास्तव्य फलटणला असते. त्यामुळे विंचुर्णीचे आकर्षण त्यांना वाटले असावे.

गौरी देशपांडे यांनी आपण पाहिलेल्या, आपण जगलेल्या जीवनाबद्दलच लिहिलेले आहे. ते एका अर्थाने फार मर्यादित अनुभवविश्व आहे. कथाकादंबऱ्यांमधील पात्रे इंटरनॅशनल असली तरी स्त्री-पुरुष संबंधाचे त्रिकोणच त्यांच्या आशय-आकृतिबंधाला आटोपशीर ठेवतात. त्या अभिजात साहित्याच्या अभ्यासक होत्या; परंतु लघुकादंबरीपेक्षा अधिक व्यापक स्वतंत्र लेखनाची बैठक त्यांनी कधी घातली नाही. अरेबियन नाइटसचे भाषांतर हा त्यांचा मोठा प्रकल्प म्हणता येईल. आहे मनोहर तरी, तराळ-अंतराळ यांचे इंग्रजी अनुवाद त्यांनी केले. प्रा. पुष्पा भावे यांनी त्यांच्या लेखनातील भावविश्व हे उच्च मध्यमवर्गीय असल्यामुळे त्यांना अभिप्रेत असणारी स्त्रीमुक्ती सोपी होते का असा प्रश्न विचारला आहे. एकीकडे मनाने मुक्त झालेल्या स्त्रीविषयी लिहिताना, गौरी देशपांडे ग्रीक वा अमेरिकन पात्रांना आणून मराठी वाचकांपासून दूर नेतात, परिचित आणि अपरिचित यांच्या मिश्रणातून स्त्रीचं भावविश्व उलगडत नेण्याचा, स्त्री-पुरुष शरीर संबंधाच्या पलीकडे जाऊन या भावविश्वाची तरलता दाखवण्याचा प्रयत्न करतात असे त्यांना वाटते. त्यांच्या कथाकादंबरीतील हे पाश्चात्य पुरुष विशेष हळुवार व समंजस आहेत. समाजाचं



दडपण न मानणाऱ्या त्यांच्या नायिका सुख शोधणं हा आपला अधिकार मानतात आणि ते सुख घेताना जबाबदारीचं भान पाळतात हे मंगला आठवलेकरांचे विधान ही मार्मिक आहे.

त्यांच्या स्त्री-पुरुष संबंधांच्या आकलनाला लाभलेली ही बहुदेशीयता मराठीत तरी वेगळी आहे. त्यांच्या काही नायिकांच्या तोंडची ही वक्तव्ये बघा. त्यावरून आपली आजची विवाहसंस्था, स्त्री-पुरुष संबंध, प्रेम, सहजीवन, नीतिअनीती याबद्दलची काही विशिष्ट भूमिका समोर येऊ शकेल.

* प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात पुरुष ही एक गोष्ट 'दिलेली' असते. या जुलमातून मी सुटायला धडपडत होते...माझ्या प्रत्येक चढावर मला हात द्यायला कुणी कुणी होतंच. आणि जोपर्यंत मी एकटी जिंकत नाही तोवर ती चढाई मला पुन्हा पुन्हा चढावीच लागेल. तेव्हा कुणी भवानी नसलेली संधी मी दवडणार नाही.'' (कारावासातून पत्रेची नायिका देवी आपल्यापासून दूर गेलेल्या मनूला उद्देशून हे विचार व्यक्त करते.)

* मजजवळ जी गोष्ट ईश्वराच्या इच्छेने आली आहे तीच इतर सर्व बायांजवळ आहे. त्यांच्याशिवाय म्हणशील तर मी एक माणूस आहे जोपर्यंत माझ्यातील 'माणूस' या व्यक्तीबद्दल तुझ्यातील 'माणूस' या व्यक्तीला दया, मैत्री सहानुभूती, प्रेम वाटत नाही किंवा वाटल्याचा मला प्रत्यय येत नाही तोपर्यंत सर्व पुरुषांना सर्व स्त्रियांच्या संदर्भात किंवा नरांना माद्यांच्या संदर्भात होणाऱ्या ग्रांथिक स्त्रावांना प्रेमबिम म्हणण्याच्या भानगडीत न पडणंच चांगलं.'' (एकेक पान गळावया).

गौरी देशपांडे यांच्या या नायिकांनी आजच्या मराठी सुखवस्तू तरुणतरुणींना एक नवे आत्मभान दिले आहे असे म्हणायला हरकत नाही. मुक्काम या त्यांच्या लघुकादंबरीतील नायिका आपल्या हिंदू संस्कारातून मोठी झालेली असून परदेशप्रवासातून व्यापक जगाचे अवलोकन केल्यावर, अलिप्तपणे, अंतर्मुख होऊन स्वत:ला जो प्रश्न विचारते, तो प्रश्न आजच्या प्रत्येक तरुणतरुणीच्या मनातही घोटाळत-घोळत असतो.

''बहुतांश लोकांनी ठराविक मार्गाने वाटचाल करण्यात ज्यांचे भले असते, अशांनी आखून दिलेल्या मार्गाने आपण आजवर का चालत आलो? आणि तेही त्याच्यात आपले फारसे भले दिसत नसताना? कुठलेही प्रश्न न विचारता, पुढे जाणाऱ्या आळशी अथवा अंध अथवा हतबल अथवा प्रवाहपतित जनांच्या ओघामधून पावलापुढे पाऊल का टाकत राहिलो? काही रूढ, कौटुंबिक वा सामाजिक संकेतात ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत, त्यांची हुकुमशाही का सहन करीत आलो?''

हे असले अडचणीचे प्रश्न अधिकाधिक धाडसीपणे विचारणाऱ्या आणखी अनेक नायिका उभ्या करण्याची आज गरज आहे. गौरी देशपांडे यांनी अशा अनेक नायिका वाचकांसमोर उभ्या केल्याही असत्या. परंतु अवघ्या साठीच्या टप्प्यावर त्यांचे निधन झाल्यामुळे त्या धाडसी नायिकांच्या अवतरणाला आपण मुकलो आहोत. त्यामुळे हळहळ वाटते. असे प्रश्न विचारण्याचे धाडस असणाऱ्या नायिका गौरी देशपांडे यांच्या इतक्या प्रभावीपणे आता कोण रंगवणार ?

## कविवर्य सुरेश भट यांचे निधन

मराठी गझलेच्या प्रांताचे अनभिषिक्त सम्राट म्हणून ज्येष्ठ कवी सुरेश भट यांचे १४ मार्च रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले ते ७१ वर्षाचे होते. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा व एक मुलगी आहे.

सुरेश भट यांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी अमरावती येथे झाला. अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातून बी. ए. पदवी मिळविल्यानंतर सुरुवातीला काही काळ त्यांनी शिक्षकी पेशात घालविला. पत्रकार या नात्याने रोखठोक वाणी व लेखणीने मुशाफिरी केल्यानंतर ते खऱ्या अर्थाने रमले ते मराठी गझल आणि कवितेच्या प्रांतातच. विशाल देहयष्टीच्या या व्यक्तीच्या मनात अतिशय हळुवार असे एक कविमन होते, याचा प्रत्यय नंतर मराठी सारस्वताला आला.


'चल उठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली' या सुमन कल्याणपूर यांनी गायलेल्या भट यांच्या पहिल्यावहिल्या गीताने अवघ्या महाराष्ट्राला वेड लावले. सुरेश भट तेव्हा केवळ विशीत होते. पण जेमतेम मिसरूड फुटलेल्या या कवीच्या काव्यातील गोडव्याने आणि साधेपणाने त्यावेळच्या प्रस्थापित साहित्यिकांचे लक्ष वेधून घेतले होते. वऱ्हाडच्या मातीतील सुरेश भट हे केवळ विदर्भापुरते मर्यादित न राहता अख्ख्या महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत झाले. महाराष्ट्राबाहेरील मराठी मनांनाही त्यांनी आपल्या शब्दसामर्थ्याने अंकित करून ठेवले होते. 'यामुळे ज्या-ज्या ठिकाणी मराठी लोक वसले आहेत, त्या सर्व ठिकाणी त्यांचे गझलगायनाचे कार्यक्रम झाले होते. ३९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. दोन वर्षापूर्वीच त्यांना विदर्भ साहित्य संघाने 'जीवनव्रती' पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.

सुरेश भट हे मराठी गझलेच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव होते. त्यांचे 'एल्गार', 'रंग माझा वेगळा', 'झंझावात' 'रूपगंधा',इ. काव्यसंग्रह गाजले होते 'मल्मली तारुण्य माझे', 'मेंदीच्या पानावर', 'मालवून टाक दीप', 'केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली', 'तरुण आहे रात्र अजुनि', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', 'चांदण्यात फिरताना' या त्यांनी लिहिलेल्या गीतांनी भावरसिकांच्या मनांवर गेली कित्येक वर्षे अधिराज्य गाजविले आहे.

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि आशा भासले यांनी या गीतांना सूर देऊन गीतातील शब्दांचे अर्थ अक्षरश: जिवत केले होते; मात्र मराठी मनाचा ठाव घेणारी ही गीते कविता म्हणून प्रकाशित न करता विदर्भातील काही वृत्तपत्रांनी या कविता त्यांना साभार परत पाठविल्या होत्या, हे विशेष उल्लेखनीय. पुढे याच कवितांनी संपूर्ण महाराष्ट्राला सुरेश भट यांच्या लेखणीच्या व शब्दांच्या सामर्थ्याची पुरेपूर जाणीव करून दिली.

'उष:काल होता होता काळरात्र झाली' या 'सिंहासन' चित्रपटातील गीताने अनेकांच्या जीवनात स्फुल्लिंग प्रज्ज्वलित केले होते. 'भीमराया गे तुझ्या लेकरांची वंदना' हे त्यांचे गीत पददलितांच्या आशाआकांक्षाचे प्रकटीकरण क़रणारे आहे.






बालमित्रांनो,

मेहता मराठी ग्रंथजगत मध्ये आता खास तुमच्यासाठी 'बालनगरी' हा विभाग सुरु करत आहोत.

त्यामध्ये तुम्हाला छान छान चित्रकथा वाचायला मिळतील. मनोरंजक माहिती, कोडी, चुटके, वगैरे नवलाईच्या गोष्टीही असतील. तुमच्या आनंदात त्यामुळे नक्कीच भर पडेल. त्याचबरोबर आम्ही काही स्पर्धाही लावणार आहोत. त्यात भाग घ्या आणि बक्षीसही मिळवा. आम्ही तुमच्यासाठी खुप छान छान पुस्तके छापत असतो. तीही तुम्ही वाचायला हवी आपल्या आईबाबांना ती आणायला सांगा.

'बालनगरी' मध्ये आम्ही तुमचे साहित्यही छापणार आाहो. तुम्हाला आवडलेला एक हास्यविनोद पोस्टकार्डावर लिहून पाठवा त्याबरोबर तुमचे पूर्ण नाव,पत्ता,इयत्ता,शाळा सर्व व्यवस्थित लिहा,आम्हाला आवडलेले विनोद आम्ही बालनगरीत छापू.आहे की नाही मज्जा?

संपादक

# कावळोबा कालिया

## चमत्का अदृश्य होतो












कालिया कावळोबाचे हे बोलणे ऐकले.
यांचा हा नेहमीचाच खेळ चालू आहे तर!जुनी खोड लौकर जात नाही.
कालिया बबलूच्या गुहेकडे उडत गेला. त्याच्या डोक्यातएक कल्पना होती.
बबलू, मी एक मधाचे पोळे टेकडीच्या माथ्यावर पाहिले.
खरंच?मग मला ते घेऊ दे.
आधी ठरल्याप्रमाणे डूब डूबने कीचू आणि मीचू यांचा पाठलाग केला.
धाव कालिया, मदत कर.
फळ
हा!हा!हा!
बबलू आणि कालिया दोघे कड्याच्या माथ्यावर पोचले.
मधाचे पोळे कुठाय कालिया?
इथेच तर होते!
आपल्या आधीच कुणीतरी घेऊन गेलेलं दिसतय.
माझंच नशीब फुटकं!
डूबडूबने पाठलाग केल्याने कीचू व मीचू कड्याच्या पायथ्याकडे धावत चाललेले कालियाला दिसले.
बबलू अरे तुझे वजन खूपच वाढलेले दिसतेय.
चल आपले कामआता सुरू करू.




कालिया, तू चुकतो आहेस.मी आधी सारखाच पळू शकतो. चढू शकतो. उडी मारू शकतो.
खरंच? तू जर या कड्यावरून त्या दगडावर उडी मारून दाखवलीस तर मी तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवीन.
मी मारली उडी!
वा! असं धाडस हवं
कीचू आणि मीचू चमत्काच्या जवळ पोचले.
धाड धाड
बबलू त्या लांडग्यावर जाऊन आदळला.
आवाजाने डूबडूब गोंधळात पडला.
चमत्का अरे कुठे आहेस तू?
मूर्खा, तुझं शेपूट आपटणं थांबव.मला मार बसतोय.
सगळे ससे निसटले
किती मऊ दगड!
गोंधळात पडलेला बबलू गुहेकडे परतला.
एका तासानंतर
चमत्का, तू अदृश्य झालास खरा, पण तुझ्या पाठीचा पार निकाल लागला.
थांब, मी तुला सोडवतो- कावळोबा.

# विनोद पाठवा !

'बालनगरी' मध्ये आम्ही तुमचे साहित्यही छापणार आहो. तुम्हाला आवडलेला एक हास्यविनोद पोस्टकार्डावर लिहून पाठवा त्याबरोबर तुमचे पूर्ण नाव,पत्ता,इयत्ता,शाळा सर्व व्यवस्थित लिहा,आम्हाला आवडलेले विनोद आम्ही बालनगरीत छापू.आहे की नाही मज्जा?

**आमचा पत्ता:**

**मेहता मराठी ग्रंथ जगत,** बालनगरी विभाग,

द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,

१२१६, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०


*बंटू : अरे छोटू, गंपूनं किती छान गोष्ट सांगितली विक्रमादित्यची ! त्याला बक्षीसपण मिळालं !*

*छोटू : अरे, त्याच्याकडे **अमरचित्रकथेची** पुस्तकं आहेत छान छान चित्रांची. म्हणून !!*

*बंटू : खरंच ? मला पण हवीत ती सगळी पुस्तकं !*

*छोटू : मला पण हवीत !*




**अमर चित्रकथेची अनेक वर्षे दुर्मिळ असलेली मुलांच्या खास आवडीची चित्रमय पुस्तके आता उपलब्ध !**

| | | |
|---|---|---|
| **राजा हरिश्चन्द्र** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **अभिमन्यू** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **विक्रमादित्य** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **छत्रपती शिवाजी** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **भीष्म** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **पृथ्वीराज चौहान** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **सम्राट अशोक** २००३ | संपादक : अनंत पै | २० |
| **राणा प्रताप** २००३ | संपादक : अनंत पै | २० |

**पोस्टेज : २०रु. संचाला २५रु.**  **खास सुट्टीसाठी आजच खरेदी करा!**





◆ एप्रिल २००३

◆ वर्ष तिसरे

◆ अंक चौथा


# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | १९ |
| **फुले आणि काटे** | २१ |
| **पुस्तक परिचय** | |
| धागे : गुलजार संपा. अनंत दिक्षित | २३ |
| सरत्या सरी : वि. स. खांडेकर | २७ |
| उगवती मने : आनंद यादव | ३० |
| कथांतर : अनु. सुनीती देशपांडे | ३५ |
| **श्रद्धांजली** | ३९ |
| **बालनगरी** | ४३ |



✠ संपादक : सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक : शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२


**Email - mehpubl@vsnl.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**



*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# निरामय, निरोगी जीवनासाठी मार्गदर्शक पुस्तके




चाळिशीनंतरच्या संपन्न वाटचालीसाठी अनेक महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयांवरील उत्कृष्ट मार्गदर्शन.

२री आवृत्ती

किंमत : १००रु.

**चाळिशीनंतरची वाटचाल**

डॉ. सुभाष दांडेकर


**आपण आणि आपले आरोग्य**

डॉ. बी. एम. हेगडे

अनु. प्रमोद जोगळेकर

आरोग्य म्हणजे शरीर, मन आणि आत्मा देखील सुदृढ असणे होय. तरूण आणि वृद्ध सर्वांनाच आरोग्य राखण्यासाठी सुटसुटीत तरीही परिपूर्ण असे मार्गदर्शक पुस्तक.




जीवनातील आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी ध्यानाद्वारे मनाला नियंत्रित, प्रशिक्षित कसं करावं, याच शास्त्रशुद्ध मार्गदर्शन

किंमत : १२५ रु.

**मनावर विजय**

एकनाथ ईश्वरन्


अनु. : वैशाली जोशी

**निरामय यशासाठी ध्यान**

शुभदा गोगटे

किंमत : ७०रु.

अतिशय व्यस्त आणि संघर्षमय दिनक्रमातही मन शांत, निरामय ठेवण्यासाठी ध्यानाच्या साध्या सोप्या पद्धतीचे विवेचन.




एकत्रित पोस्टेज ४०रु. व्ही. पी. पी. पद्धत नाही.

**आमच्या योजनांचे सभासद व्हा आणि मिळवा २५ % सवलत!**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०** ✆ ४४७६९२४ E-mail : mehpubl@vsnl.com

**मेहता बुक सेलर्स, ३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर १२** ✆ ५२२३०४

# मेहता मराठी ग्रंथजगत

**मेहता मराठी ग्रंथजगतची वार्षिक वर्गणी आता १०० रु !**

**आजच वर्गणीचे नूतनीकरण करा !**

जानेवारी २००३ पासून मेहता मराठी ग्रंथजगतची वार्षिक वर्गणी १००रु झाली आहे. सर्व सभासदांनी आपल्या वर्गणीचे नूतनीकरण डिसेंबर २००२ पर्यंत केल्यास ८० रु वर्गणी भरावी लागेल.

तीन व पाच वर्षाच्या वर्गणीत कोणतीही वाढ करण्यात आली नाही. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.


भेट !

**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास आकर्षक भेट !**

**एक वर्षाची** वर्गणी **८० रु.,**
**तीन वर्षांची २०० रु.** आणि
**पाच वर्षांची ३०० रु.**

**३** वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'आज इथे उद्या तिथे - वि. स. वाळिंबे'**
हे ४५ रु. चे पुस्तक भेट ! पोस्टेज २० रु.

**५** वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'झ्लाटाज् डायरी - अनु. ज्ञानदा नाईक'**
हे ८० रु. चे पुस्तक भेट ! पोस्टेज २० रु.







***वर्गणी पाठवण्याचा पत्ता :***

मेहता मराठी ग्रंथजगत,
मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०
फोन - ४४७६९२४